रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १८ ◆ अंक ११७
www.ramprahar.com

# राम प्रहर

◆ शुक्रवार, १४ नोव्हेंबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## पुण्यातील नवले पुलावर भीषण अपघात; पाच जणांचा मृत्यू



**पुणे :** येथील नवले पुलावर गुरुवारी (दि.१३) सायंकाळी एका अनियंत्रित कंटेनरने कारसह १० ते १२ वाहनांना जोरदार धडक दिली. या वेळी अनेक वाहनांना आग लागली. या अपघातामध्ये पाच जणांचा मृत्यू झाला असून काही जण जखमी आहेत. जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. पुणे-बंगळुरू महामार्गावरून साताऱ्याहून पुण्याच्या दिशेने हा कंटेनर येत होता. नवले पुलावरून खाली उतरत असताना चालकाचे कंटेनरवरील नियंत्रण सुटले. त्यानंतर या कंटेनरने समोर येईल त्या वाहनांना धडक दिली. हा अपघात इतका भीषण होता की, वाहनांना आग लागून पाच जणांचा होरपळून अक्षरश: कोळसा झाला. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत जखमींना रुग्णालयात दाखल केले, तर मृतदेह विच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवले. मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त होत आहे.

अंतरंग

म्हसळ्यात आढळलेली 'ती' पिल्ले वाघाटीची!/२

रायगडात १३ डिसेंबरला राष्ट्रीय लोक अदालत/५

एमसीएच्या स्पर्धेत रायगडची दणदणीत विजयी सलामी/८

# उरणमध्ये भाजप महायुतीचे शक्तिप्रदर्शन

## मंत्री आशिष शेलार यांच्या उपस्थितीत उमेदवारांचे अर्ज दाखल





(अधिक छायाचित्रे पान ३ वर..)

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

उरण नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी भाजप महायुतीच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार शोभा कोळी-शाह तसेच नगरसेवकपदाच्या उमेदवारांनी गुरुवारी (दि.१३) राज्याचे माहिती तंत्रज्ञान आणि सांस्कृतिक कार्यमंत्री तथा भाजपचे रायगड जिल्हा संपर्कमंत्री अ‍ॅड. आशिष शेलार यांच्या प्रमुख उपस्थितीत अर्ज दाखल केले. या वेळी निघालेल्या रॅलीत शेकडो कार्यकर्त्यांसह नागरिकांनी उपस्थिती दर्शविली.

उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी उरण कोटनाका येथून जोरदार घोषणाबाजी आणि शक्तिप्रदर्शन करीत रॅली निघाली. या रॅलीत मंत्री आशिष शेलार, पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, उरणचे आमदार महेश बालदी, भाजपचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब पाटील, जे.एम. म्हात्रे, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, खालापूर तालुकाध्यक्ष प्रवीण मोरे, उरण तालुकाध्यक्ष रवी भोईर, शहराध्यक्ष कौशिक शाह, युवा नेते प्रितम म्हात्रे, उरण ग्रामीण मंडळ अध्यक्ष धनेश गावंड, शहर मंडळ अध्यक्ष प्रसाद भोईर, महिला मोर्चा ग्रामीण अध्यक्ष राणी म्हात्रे, शहराध्यक्ष संपूर्णा थळी, भाजप जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, उपाध्यक्ष चंद्रकांत घरत, गणेश कडू, कामगार नेते सुधीर घरत, माजी जि.प. सदस्य राजेंद्र पाटील, विजय भोईर, माजी नगराध्यक्ष नितीन पाटील, पनवेल तालुका पश्चिम मंडळ अध्यक्ष रूपेश धुमाळ, दक्षिण तालुकाध्यक्ष मंगेश वाकडीकर, माजी सरपंच जितेंद्र घरत, तालुका उपाध्यक्ष पंडित घरत, सरचिटणीस समीर मढवी, नवीनशेठ राजपाल, महिला नेत्या सीमा घरत यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. रॅलीतील शिस्तबद्धता, तरुणांचा उत्साह, महिलांचा सक्रिय सहभाग आणि नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद पाहता उरणमध्ये भाजप महायुतीची लाट असल्याचे दिसून आले. (पान २ वर..)

### उरणकरांचा चॉईस भाजप महायुती!

उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर पत्रकारांशी संवाद साधताना मंत्री अ‍ॅड. आशिष शेलार म्हणाले की, जनतेचा आशीर्वाद १०० टक्के आमच्याबरोबर आहे. विरोधकांचा जनतेशी कोणताही संपर्क उरलेला नाही. त्यामुळे उरणकरांचा चॉईस भाजप आणि महायुती आहे. २ तारखेला मतदान होईल, तेव्हा आम्हाला दुपटीने मतदान होतील आणि ३ तारखेला मतमोजणीदरम्यान विरोधकांचे तीन-तेरा वाजतील!

या बातमीचा व्हिडीओ पाहण्यासाठी हा क्यूआर कोड स्कॅन करा

# राज्य निवडणूक आयोगाकडून अद्ययावत मतदार यादी प्रसिद्ध

■ **मतदारसंख्या नऊ कोटी ८४ लाखांवर**

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी मतदारांची अद्ययावत यादी राज्य निवडणूक आयोगाने प्रसिद्ध केली आहे. आयोगाने आपल्या अधिकृत संकेतस्थळावर १ जुलै २०२५ रोजीची अंतिम मतदार यादी प्रसारित केली असून त्यानुसार राज्यातील एकूण मतदारसंख्या नऊ कोटी ८४ लाख ९६ हजार ६२६ इतकी झाली आहे.

मागील सात महिन्यांच्या कालावधीत राज्यात १८ लाख ८० हजार ५५३ नव्या मतदारांची नोंदणी करण्यात आली आहे, तर चार लाख नऊ हजार ४६ मतदारांची नावे मतदार याद्यांतून वगळण्यात आली आहेत. मागील विधानसभा निवडणुकीदरम्यान राज्यातील मतदारसंख्या नऊ कोटी ७० लाख २५ हजार ११९ इतकी होती. त्यामध्ये यंदा जवळपास १४.७ लाख मतदारांची वाढ झाली आहे.

ठाणे जिल्ह्यात यंदा सर्वाधिक नव्या मतदारांची नोंदणी करण्यात आली आहे. आयोगाच्या आकडेवारीनुसार ठाण्यात दोन लाख ७१ हजार ६६६ नव्या मतदारांनी अर्ज केले होते तसेच ४५ हजार ८०० जणांनी नावे वगळण्यासाठी अर्ज केले होते. त्यामुळे ठाणे जिल्ह्यात यंदा दोन लाख २५ हजार ८६६ मतदारांची भर पडणार आहे. इतर सर्व जिल्ह्यांच्या तुलनेत ही संख्या सर्वाधिक आहे. ठाण्यापाठोपाठ पुणे जिल्हा आणि मुंबई उपनगरात सर्वाधिक मतदारांची नोंद दिसून आली आहे.

मतदार यादीत नाव नोंदवण्यासाठी आयोगाकडे फॉर्म क्रमांक ६द्वारे १६ लाख ८३ हजार ५७३ नागरिकांनी अर्ज दाखल केले तसेच परदेशात राहणाऱ्या भारतीय नागरिकांसाठी असलेल्या फॉर्म क्र. ६ 'अ'द्वारेदेखील १३९ जणांनी अर्ज प्राप्त झाल्याची माहिती राज्य निवडणूक आयोगाने दिली. अर्ज क्र. ८ भरून एकूण एक लाख ९६ हजार ८४१ जणांनी दुरूस्ती किंवा बदलासाठी अर्ज सादर केले. हे तीन प्रकारचे अर्ज लक्षात घेता राज्यात यंदा १८ लाख ८० हजार ५५३ जणांच्या नावांची नोंदणी करण्यात आली. त्याचवेळी या सात महिन्यांच्या कालावधीत राज्यात अर्ज क्र. ७ भरून एकूण चार लाख ९ हजार ४६ जणांनी नावे वगळण्यासंदर्भात अर्ज केले असून ते आयोगाने मान्य केले आहेत.

# पनवेलच्या नितळस परिसरात बिबट्याचा वावर

### आमदार प्रशांत ठाकूर यांची तहसीलदारांकडे उपाययोजनेची मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील नितळस गाव परिसरात अलिकडच्या काही दिवसांत बिबट्याच्या हालचाली, त्यांच्या उपस्थितीची चिन्हे आणि संचारकाळातील दृश्ये समोर आली आहेत. त्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर संयुक्त पाहणी व स्थळभेट आयोजित करून या विषयावर प्रभावी नियंत्रणासाठी आवश्यक उपाययोजना राबवाव्यात, अशी मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी तहसीलदार मिनल भामरे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

या निवेदनात आमदार प्रशांत ठाकूर यांनी म्हटले आहे की, नितळस गाव परिसरात नागरिकांची सुरक्षितता, जंगलक्षेत्रातील नियंत्रण तसेच बिबट्याला विनाव्यत्यय सुरक्षितरीत्या पकडण्यासाठी आवश्यक उपाययोजना राबविणे अत्यंत आवश्यक झाले आहे. या अनुषंगाने वन विभाग, महापालिका व पोलीस विभाग यांच्यात समन्वय होणे आणि प्रत्यक्षस्थळी संयुक्त पाहणी घेणे अत्यंत गरजेचे आहे.

आपण संबंधित वनविभाग अधिकारी पोलीस अधिकारी व स्थानिक प्रशासनासोबत प्रत्यक्षस्थळी भेट देऊन परिस्थितीचा आढावा घ्यावा. नागरिकांच्या सुरक्षेसाठी आणि वन्यप्राण्यांच्या संरक्षणासाठी आवश्यक ती मार्गदर्शक सूचना देऊन योग्य उपाययोजना तातडीने राबवावी, असे आमदार प्रशांत ठाकूर यांनी निवेदनात नमूद केले आहे.

बिबट्याचा वावर लक्षात घेता परिसरात रात्रीच्या वेळी गस्त वाढविणे, नागरिकांमध्ये जनजागृती मोहीम राबविणे, आवश्यक तेथे पिंजरे व तांत्रिक साधनांची उपलब्धता तसेच हेल्पलाइन व सूचना प्रणाली मजबूत करणे आवश्यक असल्याचेही या निवेदनात अधोरेखित करण्यात आले आहे.

# तुर्कीमधील अबू उकासा दिल्ली स्फोटाचा सूत्रधार?



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

लाल किल्ल्याजवळ झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या आणि जैश-ए-मोहम्मदच्या फरिदाबाद-सहारापूर मॉड्यूलच्या तपासात महत्त्वाचे खुलासे झाले आहेत. दिल्ली स्फोटाचा मास्टरमाइंड म्हणून अबू उकासा (कोड नेम) याचे नाव समोर आले आहे.

स्फोटात वापरण्यात आलेल्या कारचाचालक मोहम्मद उमर हा तुर्कीमधील अंकार येथील उकासाच्या संपर्कात होता. उकासा हा मोहम्मद आणि मुजम्मिल शकीलचा हँडलर असल्याचे सांगितले जात आहे, तर हे दहशतवादी ३२ कारच्या सहाय्याने अनेक ठिकाणी स्फोट घडवण्याच्या तयारीत होते.

## निवडक

### बिहारमधील विधानसभा निवडणुकीची आज मतमोजणी

**पाटणा :** बिहारमधील विधानसभा निवडणुकीची मतमोजणी शुक्रवारी (दि. १४) सकाळी ८ वाजल्यापासून होणार आहे. ३८ जिल्ह्यांमध्ये मिळून ४६ मतमोजणी केंद्र आहेत. नमुना १७ क आणि ईव्हीएम डाटा जुळत नसल्यास आणि सरावासाठीचा डेटा जिथे नष्ट करायचा राहीला असेल, तिथे व्हीव्हीपॅट मोजणी अनिवार्य करण्याचे निर्देश निवडणूक आयोगाने दिले आहेत.

### आजपासून भारत-आफ्रिका पहिला कसोटी सामना

**कोलकाता :** भारत दौऱ्यावर आलेल्या दक्षिण आफ्रिका क्रिकेट संघासोबत टीम इंडियाचा पहिला कसोटी सामना शुक्रवार (दि. १४)पासून ईडन गार्डन्सवर खेळला जाणार आहे. भारताचा फॉर्ममध्ये असलेला यष्टिरक्षक-फलंदाज ध्रुव ज्युरेल या कसोटीसाठी सज्ज आहे, तर अष्टपैलू नितीशकुमार रेड्डीला द. आफ्रिका अ संघाविरुद्ध वनडे मालिकेत खेळण्यासाठी कसोटी संघातून मुक्त करण्यात आले आहे.

# सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी रामकाल पथाचे मुख्यमंत्री फडणवीसांच्या हस्ते भूमिपूजन

**नाशिक : प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या पर्यटन मंत्रालयाच्या माध्यमातून स्पेशल असिस्टंट टू स्टेटस् फॉर कॅपिटल इन्व्हेस्टमेन्ट योजनेंतर्गत ९९ कोटी १४ लाख रुपये खर्चातून रामकुंडसह परिसरात रामकाल पथ साकारण्यात येणार आहे. त्याचे भूमिपूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते गुरुवारी (दि. १३) करण्यात आले.



नाशिक येथील रामकुंड परिसरात झालेल्या या कार्यक्रमास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन, शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे, क्रीडामंत्री अ‍ॅड. माणिकराव कोकाटे, आमदार सर्वश्री अ‍ॅड. राहुल ढिकले, दिलीप बनकर, देवयानी फरांदे, सीमा हिरे, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह, पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, महापालिका आयुक्त मनीषा खत्री, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, कुंभमेळा अतिरिक्त आयुक्त कल्पना नायर, सहायक जिल्हाधिकारी अर्पिता ठुबे आदी उपस्थित होते.

रामकाल पथ प्रकल्पाच्या भूमिपूजनानंतर मुख्यमंत्री फडणवीस आणि उपमुख्यमंत्री शिंदे यांनी काळाराम मंदिराला भेट देऊन दर्शन घेतले. या वेळी मंदिर विश्वस्तांतर्फे मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

# समाजोपयोगी उपक्रमांना अनन्यसाधारण महत्त्व -लोकनेते रामशेठ ठाकूर

### अस्थायी वाहन पार्किंग सेवेचे उद्घाटन



या बातमीचा व्हिडीओ पाहण्यासाठी हा क्यूआर कोड स्कॅन करा

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

लोकांसाठी काम करण्याची जाणीव म्हणजेच सामाजिक बांधिलकी असते. त्यामुळे समाजोपयोगी उपक्रमांना अनन्यसाधारण महत्त्व आहे, असे प्रतिपादन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी नवीन पनवेल येथे केले.

माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, माजी नगरसेवक अ‍ॅड. मनोज भुजबळ, वाहतूक पोलीस विभाग, नवीन पनवेल वेल्फेअर असोसिएशन यांच्या पुढाकारातून पनवेल रेल्वेस्थानकातील नवीन पनवेल बाजूस उभारण्यात आलेल्या अस्थायी वाहन पार्किंग सेवेचे उद्घाटन तसेच हेल्मेट आणि वाहतूक पोलीस मित्र ओळखपत्राचे वाटप लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या बुधवारी (दि. १२) हस्ते करण्यात आले. त्या वेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते.


या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, वाहतूक विभागाचे पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील, नवीन पनवेल अध्यक्ष दशरथ म्हात्रे, कार्यक्रमाचे आयोजक माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, माजी नगरसेवक अ‍ॅड. मनोज भुजबळ, माजी नगरसेविका सुशीला घरत, माजी नगरसेवक अजय बहिरा, उमेश इनामदार, प्रशांत फुलपगार, सुधाकर थवई, विजय म्हात्रे, डॉ. अस्मिता घरत, नवीन पनवेल वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष ए.सी. झुल्का, श्री.देसाई यांच्यासह नागरिक उपस्थित होते. (पान २ वर..)

# श्रीमद्भगवद्गीता पठण स्पर्धेचे पनवेलमध्ये प्रथमच आयोजन

■ **रविवारी विभागनिहाय प्राथमिक फेरी**

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष पनवेल तालुका, संस्कार भारती पनवेल महानगर, संस्कृत भारती पनवेल आणि श्री गुरूकुलम न्यास यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीमद्भगवद्गीता पठण स्पर्धेची प्राथमिक फेरी रविवारी (दि. १६) विभागनिहाय पनवेल, नवीन पनवेल, कामोठे आणि खांदा कॉलनी येथे आयोजित करण्यात आली आहे. विशेष म्हणजे प्रथमच अशा स्पर्धेचे आयोजन पनवेलमध्ये करण्यात आले आहे.




लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली होणाऱ्या या स्पर्धेसाठी प्रवेश विनामूल्य आहे. सकाळी ९ ते दुपारी वाजेपर्यंत होणारी ही प्राथमिक फेरी शालेय आणि खुला अशा दोन गटात होणार आहे. शालेय गट फेरी पनवेलमधील लोकनेते दि.बा. पाटील विद्यालय, नवीन पनवेल येथील सीकेटी विद्यालय, कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, तर खुल्या गटातील फेरी खांदा कॉलनीमधील सीकेटी महाविद्यालयात होणार आहे.

स्पर्धा प्रथम प्राथमिक आणि अंतिम फेरी अशा टप्प्यात घेण्यात येणार आहे. प्रत्येक स्पर्धकाला सहभाग प्रमाणपत्र दिले जाणार असून विजेत्यांना रोख रक्कम, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे.

# पनवेल महापालिकेच्या माध्यमातून खारघरमध्ये विकास

## माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांचे प्रतिपादन; दैनिक बाजारांचे भूमिपूजन





**खारघर : रामप्रहर वृत्त**

सिडकोने खारघर परिसराचा चांगल्या पद्धतीने विकास न केल्यामुळे नागरिकांना तसेच व्यापाऱ्यांना अनेक सुविधांचा अभाव जाणवत होता. सिडकोने सर्व सोयीसुविधा देणे अपेक्षित होते, मात्र ते झाले नाही. त्यामुळे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रयत्नांनी पनवेल महापालिकेची स्थापना झाली आणि महापालिकेच्या वतीने माध्यमातून नियोजनबद्ध पद्धतीचा विकास खारघर शहरामध्ये होत असून नागरिकांना विविध सुविधाही उपलब्ध होत आहेत, असे प्रतिपादन माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी खारघरमध्ये दैनिक बाजारांच्या भूमिपूजनावेळी केले.

आमदार प्रशांत ठाकूर आणि माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या प्रयत्नांमुळे खारघरमध्ये दैनिक बाजारांची निर्मिती केली जाणार आहे. त्यानुसार १२ कोटी ४० लाख २३ हजार ६९१ रुपयांच्या निधीमधून खारघरमधील १५ भूखंडांवर दैनिक बाजार सुरू करण्यात येणार आहेत. या बाजारांच्या कामांचे भूमिपूजन माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते बुधवारी (दि. १२) झाले.

या कार्यक्रमास भाजप खारघर शहर मंडळ अध्यक्ष प्रवीण पाटील, माजी नगरसेवक अभिमन्यू पाटील, निलेश बाविस्कर, नरेश ठाकूर, माजी नगरसेविका हर्षदा उपाध्याय, नेत्रा पाटील, जिल्हा सचिव कीर्ती नवघरे, उपाध्यक्ष संजय घरत, समीर कदम, (पान २ वर..)

या बातमीचा व्हिडीओ पाहण्यासाठी हा क्यूआर कोड स्कॅन करा

# पनवेलमध्ये उद्या साहित्यिकांचा गौरव सोहळा आणि कविसंमेलन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल व पनवेल शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि. १५) पनवेलमध्ये साहित्यिकांचा गौरव सोहळा आणि कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे.

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या सोहळ्याला महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध हास्यकवी अशोक नायगावकर, सुप्रसिद्ध कवी अरुण म्हात्रे, ज्येष्ठ गझलकार ए.के. शेख आदी उपस्थित राहणार आहेत.

पनवेल मार्केट यार्ड येथील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात शनिवारी सायंकाळी ४ वाजता सोहळा होणार आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी ७५व्या वर्षात पदार्पण केल्याबद्दल त्यांचा तसेच साहित्यिकांचा सत्कार या वेळी केला जाणार आहे, तर कविसंमेलनात सहभागी कवींना प्रमाणपत्र आणि स्मृतीचिन्ह दिले जाईल.

या सोहळ्यास रसिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल शाखेचे अध्यक्ष गणेश कोळी, पनवेल शाखेचे अध्यक्ष सुभाष कुडके यांनी केले आहे.

# रायगड जिल्ह्यात बेदरकार चालकांवर पोलिसांची कारवाई

## ९२ लाख ४७ हजार रुपयांची दंड वसुली

**अलिबाग : प्रतिनिधी**

वेगाच्या आकर्षणामुळे तरूणाईकडून वाहतुकीचे नियम पाळले जात नाहीत. त्यामुळे अशा चालकांना वाहतुकीच्या नियमांची आठवण करून देण्यासाठी वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारण्यास सुरुवात केली आहे. महिनाभरात तब्बल नऊ हजार २८५ चालकांवर कारवाई केली आहे. या कारवाईतून पोलिसांनी ९२ लाख ४७ हजार ३०० रुपयांचा दंड वसूल केला आहे. या कारवाईमुळे वाहनांच्या वेगावर आणि वाहतूकीचे नियम मोडण्यावर आळा बसेल असा दावा पोलीसांनी केला आहे.

गुलाबी थंडीची चाहूल जिल्ह्यात सुरू झाल्याने पर्यटक येण्यासही सुरुवात झाली आहे. यामध्ये तरुण पर्यटकांची संख्या जास्त आहे, पण अनेक तरूण अतिउत्साहात वाहतुकीच्या नियमांचे सर्रास उल्लंघन करतात. एका दुचाकीवरून तिघांनी प्रवास करणे, वेगमर्यादेपेक्षा जास्त वेगाने वाहने चालविणे यामुळे अनेकदा वाहनचालक स्वतः सह इतरांच्या जीवालाही धोका निर्माण करतात. त्यातच जिल्ह्यात असणारे खड्डेमय रस्त्यांमुळे अपघाताचा धोका वाढला आहे. यामुळे वाहतूक पोलिसांनी वाहतुकीच्या नियमांचे पालन न करता बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्या तसेच अवैधरीत्या वाहतुकीला अडथळे निर्माण करणाऱ्या वाहनचालकांवर कारवाईचा बडगा उगारला आहे. १ ते ३१ ऑक्टोबरपर्यंत तब्बल नऊ हजार २८५ चालकांवर कारवाई केली आहे. या कारवाईतून पोलिसांनी ९२ लाख ४७ हजार ३०० रुपयांचा दंड वसूल केला आहे. यामुळे वाहनचालकांचे धाबे दणाणले आहेत. मागील काही दिवसात शहरात वाहनांची संख्या झपाट्याने वाढत आहे. शिवाय शनिवार–रविवार पर्यटकदेखील शहरात दाखल होतात. त्यामुळे अलिबागकरांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागू नये म्हणून ही विशेष मोहीम राबविण्यात येत आहे.

वाहतुकीतील अव्यवस्था आणि अपघाताचे प्रमाण कमी करण्याच्या उद्देशाने पोलिसांनी विविध ठिकाणी विशेष तपासणी मोहीम राबवत आहेत. वेगाने वाहन चालविणारे चालक यांच्यावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले

> **सध्या रस्ते अपघाताचे प्रमाण वाढले आहे. याचे मुख्य कारण म्हणजे अतिवेगाने वाहने चालविणे यामुळे आपण आपल्यासोबतच इतरांचाही जीव धोक्यात घलत आहोत याची जाणीवच वाहनचालकांना नसते. यासाठीच आम्ही वेळोवेळी अशी दंडात्मक कारवाई करून वाहनचालकांमध्ये वाहतुकीच्या नियमांबाबत जनजागृती निर्माण करीत आहोत. यासाठी शहरासह राज्यमार्ग, शाळा, महाविद्यालयांच्या ठिकाणीही वाहतूक पोलीस तैनात ठेवण्यात आले आहेत.**
>
> **–अभिजित भुजबळ, पोलीस निरीक्षक, जिल्हा वाहतूक शाखा**

# महाड नगर परिषद निवडणुकीत नवी समीकरणे; राष्ट्रवादी–भाजप युती जाहीर

## ■ राष्ट्रवादी १५, तर भाजप पाच जागा लढवणार

**महाड : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे पडघम वाजू लागले असून, महाड नगरपरिषदेच्या निवडणुकीत महायुतीत फूट पडल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत. शिवसेना (शिंदे गट) ला वगळत राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) आणि भारतीय जनता पक्ष यांनी एकत्र येऊन निवडणूक लढवण्याची घोषणा केली आहे. ही घोषणा राष्ट्रवादी काँग्रेसचे विधान परिषद माजी आमदार अनिकेत तटकरे यांनी महाड



येथील पत्रकार परिषदेत केली.

यावेळी बोलताना अनिकेत तटकरे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस नगरसेवक पदाच्या १५ जागांवर, तर भाजपा पाच जागांवर आपले उमेदवार उभे करणार असे जाहीर केले. त्यामुळे शिवसेना (शिंदे गट) या निवडणुकीत स्वतंत्रपणे उमेदवार रिंगणात उतरवेल, हे आता जवळपास निश्चित झाले आहे. महाड नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष पदासह एकूण २० जागांसाठी निवडणूक होत आहे. यामध्ये पाच जागा भाजपकडे, तर १५ जागांसह नगराध्यक्ष पद राष्ट्रवादी काँग्रेसकडे राहणार आहे.

खासदार सुनील तटकरे आणि भाजपचे वरिष्ठ नेते उद्या महाडमध्ये येत असून, भाजपा–राष्ट्रवादीचे सर्व उमेदवार एकत्रितरित्या जाहीर करणार असल्याचे अनिकेत तटकरे यांनी सांगितले. स्वतंत्र जाहीरनामा प्रसिद्ध होणार.. राष्ट्रवादी आणि भाजप एकत्र लढवणार असून महाड नगरीसाठी स्वतंत्र जाहीरनामा प्रसिद्ध केला जाणार आहे.

# साजगाव यात्रेत सुकी मासळी, जिलेबी खरेदीसाठी खवय्यांची गर्दी

**खोपोली :** खालापूर तालुक्यात साजगांव येथे विठ्ठल मंदिर परिसरात ०२ नोव्हेबंर पासून बोंबल्या विठोबाची यात्रा सुरु आहे. सतत पंधरा दिवस चालणारी कोकण विभागातील ही एकमेव मोठी यात्रा आहे.या यात्रेत विविध प्रकारची सुकीमासळीची खरेदी व खास आकर्षण असलेल्या गरमागरम जिलेबीचा स्वाद घेण्यासाठी खवय्यांची प्रचंड गर्दी होत असून,मोठया प्रमाणात उत्तम व योग्य दरात चांगली सुकीमासळी येथे मिळत असल्याने साजगावची यात्रा खवय्यांसाठी मोठी प्रवर्णी ठरत असल्याचे यात्रेतील दृष्य आहे. साजगांवच्या यात्रेतील अनोखा बैल बाजार व सर्व प्रकारच्या सुकीमासळीचा बाजार प्रसिद्ध आहे. यात्रेत सुकी मासळीची जवळपास शंभरच्या वर दुकाने तर तेवढीच दुकाने मिठाईची लागली आहेत.



सुकी मासळी खरेदीसाठी संपूर्ण खालापूर तालुका ,पेण खोपोली–कर्जत तालुक्यासह रायगड ,ठाणेसह पुणे व आजूबाजूच्या जिल्ह्यातील खवय्ये गर्दी करीत आहेत. यात्रेत बोंबील,सुकट,सोडे ,दांडी सुकट,मांदेली,ढोमे ,अंबाडी सुकट,आकडी सुकट,बांगडे ,सुरमई ,माकली, बांगडा,अशा विविध प्रकारची सुखी मासळी विक्रीसाठी उपलब्ध आहे.

रविवार पासून यात्रेला रंग चढूलागला असून, संध्याकाळी चार नंतर येथे मोठी गर्दी होत आहे .येथील विविध मिठाई बरोबरच गरमागरम जिलेबीची विशिष्ठ ओळख आहे.मिठाईचीही जवळपास सत्तरच्यावर दुकाने आहेत. जिलेबी सर्वात जास्त भाव खाऊन जात असल्याचे दिसत आहे.येतील बैल बाजारात मात्र काहीसा निरुत्साह दिसत आहे .

# पोलादपुरात घरपट्टीवाढीविरोधात आज जनआक्रोश मोर्चा

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्याच्या ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीमध्ये रूपांतर झाल्यानंतर गेल्या वर्षीपासून घरपट्टी वाढीसंदर्भात नोटीसा बजावणाऱ्या नगरपंचायत प्रशासनाने यंदाही वाढीव अवाजवी घरपट्टी आकारणीसंदर्भात नोटीसा बजावल्याने यावेळी जनतेचा उद्रेक होण्यास सुरूवात झाली. या अनुषंगाने पोलादपूर बाजारपेठेतील श्रीगणेशमंदिरात तीन बैठका होऊन १४ नोव्हेंबर रोजी घरपट्टीवाढीविरोधात जनआक्रोश मोर्चा काढण्याचा निर्धार यावेळी सर्वांनी व्यक्त केल्यानंतर याबाबतचे निवेदन नगरपंचायतीचे मुख्याधिकारी विनय शिपाई यांना देण्यात आले.

यानंतर लगेचच मुख्याधिकारी शिपाई यांनी गुरूवारी नगरपंचायत कार्यालयामध्ये सर्व संबंधितांना उपनगराध्यक्ष व नगरसेवकांसमक्ष चर्चेचे निमंत्रण दिल्याने गुरूवारी नागरिक, नगरसेवक तसेच प्रशासन यांच्यातील चर्चे दरम्यान,नगरपंचायत प्रशासन आणि नगरसेवक अधिनियमांपुढे हतबल असल्याचे दिसून आले आणि मुख्याधिकारी शिपाई यांनी जनआक्रोश मोर्चा काढण्याचा जनतेचा अधिकार कोणी हिरावून घेतला नसल्याचे स्पष्ट करून तोच एकमेव पर्याय असला तरी प्रशासन आणि नगरसेवकांच्या प्रयत्नांना कितपत यश मिळेल याबाबत साशंकता व्यक्त केली. यामुळे पोलादपूर नागरिक समस्या निवारण मंचातर्फे जनआक्रोश मोर्चा काढण्यात येणार आहे.

# माथेरानमध्ये चार दिवस झाले तरी एकही उमेदवारी अर्ज नाही!

**माथेरान : बातमीदार**

माथेरान नगरपालिकेची रणधुमाळी सुरू झाली असून निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सोमवार पासून सुरुवात झाली होती मात्र चार दिवस उलटले तरी पण एकही उमेदवारी अर्ज दाखल झालेला नाही.माथेरान नगरपालिकेत एकूण वीस सदस्य प्रभागनिहाय निवडले जाणार असून नगराध्यक्ष जनतेतून निवडला जाणार आहे.

माथेरान नगरपलिकेत दहा प्रभागात





एकूण वीस सदस्य आणि थेट जनतेतून नगराध्यक्ष निवडण्यासाठी निवडणूक प्रक्रिया सुरू झाली आहे.निवडणुकी साठी येथील नगरपालिका कार्यालयात निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय बनविण्यात आलेले आहे.या ठिकाणी निवडणूक निर्णय अधिकारी सुरेंद्रसिंह ठाकूरआणि सहनिवडणूक अधिकारी तथा मुख्याधिकारी राहुल इंगळे तसेच कर्जत तालुका निवडणूक अधिकारी नायब तहसीलदार गोविंद कोटुंब यांच्यावर जबाबदारी आहे.

उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरुवात होउन चार दिवस झाले तरी अजून एकही उमेदवारी अर्ज दाखल झालेला नाही. नगरपालिकेसाठी ४०५५ मतदार असून १० प्रभागात मतदान होणार आहे

**पान १ वरुन**

## उरणमध्ये भाजप महायुतीचे शक्तिप्रदर्शन

या वेळी थेट नगराध्यक्षपदासाठी शोभा कोळी–शाह यांनी उमेदवारी अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी तथा उरणचे तहसीलदार डॉ. उद्धव कदम यांच्याकडे दाखल केला. त्याचप्रमाणे नगरसेवकपदासाठी जविंद्र लक्ष्मण कोळी, रजनी सुनील कोळी, नंदकुमार बाबाजी लांबे, नम्रता प्रवीण ठाकूर, सुरेश वामन शेलार, संदीप शशिकांत पानसरे, रोशनी सचिन थळी, स्नेहल भिमदास कासारे, रिना निलेश पाटील, रवी यशवंत भोईर, पूर्वा योगेश वैवडे, रोहित नितीन पाटील, गणेश सदाशिव पाटील, सायली विशाल पाटेकर, राजेश मधुकर ठाकूर, सायली सविन म्हात्रे, दमयंती वैभव म्हात्रे यांनीही उमेदवारी अर्ज सादर केला, तर रिबेका रवींद्र मढवी, हिदा हमीद सरदार, जसीम इस्माईल गॅस आणि शाहिस्ता इब्राहिम कादरी शुक्रवारी (दि. १४) अर्ज दाखल करणार आहेत.

## समाजोपयोगी उपक्रमांना अनन्यसाधारण महत्त्व –लोकनेते रामशेठ ठाकूर





या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर म्हणाले की, कामाची आस्था असेल तर काम करणे सोपे होते. माझ्या आयुष्यातील ७५ वर्षे पूर्ण होत आहेत, तरीसुद्धा सामाजिक कार्य केल्याशिवाय स्वस्थ बसता येत नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस देशाच्या आणि राज्याच्या विकासासाठी प्रचंड मेहनत घेत आहेत. त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन आपणही सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवून समाजासाठी कार्यरत राहिले पाहिजे. केल्याने होत आहे आधी केलेच पाहिजे या भावनेतून प्रत्येकाने समाजकार्यात आपला वाटा उचलला पाहिजे.

वाहतुकीची वर्दळ पाहता वाहन पार्किंग अपुऱ्या पडत आहेत. त्यामुळे वाहतूक पोलीस अधिकारी औदुंबर पाटील, माजी नगरसेवक मनोज भुजबळ व संदीप पाटील, वेल्फेअर असोसिएशन यांनी रेल्वेशी समन्वय साधून अस्थायी स्वरूपात पण चांगल्या प्रकारे पार्किंग सेवा उपलब्ध करून दिली आहे. त्यामुळे हा समाजोपयोगी चांगला उपक्रम असल्याचे अधोरेखित केले तसेच सर्वांनी वाहतुकीचे नियम व शिस्त पाळावी, असे आवाहनही त्यांनी केले.

या वेळी वाहतूक विभागाचे पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील यांनी वाहतुकीचे नियम या विषयावर मार्गदर्शन केले, तर प्रास्ताविकातून संदीप पाटील यांनी या पार्किंगसंदर्भात माहिती दिली.

## पनवेल महापालिकेच्या माध्यमातून खारघरमध्ये विकास

प्रभाग क्रमांक ६चे अध्यक्ष वासुदेव पाटील, उपाध्यक्ष किरण पाटील, शहर उपाध्यक्ष अजित अडसूळ, अमर उपाध्याय, शिवसेना शहरप्रमुख प्रसाद परब, भाजप महिला मोर्चा शहराध्यक्ष साधना पवार, विनोद ठाकूर, युवा मोर्चा शहराध्यक्ष नितेश पाटील, प्रवीण बेरा यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.

# मुरूड नगर परिषद सार्वत्रिक निवडणुकीकरिता पाच उमेदवारी अर्ज दाखल

**मुरुड : रामप्रहर वृत्त**

मुरूड जंजिरा नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुक २०२५करिता उमेदवारी अर्ज भरण्यासाठी आज चौथ्या दिवशी मुर्हता मिळाला असुन गुरुवारी पाच उमेदवारी अर्ज दाखल झाले.

मुरुड जंजिरा नगरपरिषदेची सार्वत्रिक निवडणूक २ डिसेंबर ला होत असुन त्या करिता उमेदवारी अर्ज भरण्यास सुरुवात झाली असून आज शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाकडून कुणाल शरद सतविडकर यांनी प्रभाग क्रमांक ४ अ ,रुपेश रमेश पाटील प्रभाग क्रमांक १ब,आदेश हरिश्चंद्र दांडेकर प्रभाग क्रमांक ६ब मधुन तर शिवसेना शिंदे गट कडुन हर्षल अविनाश दांडेकर प्रभाग क्रमांक ६ ब व प्रभाग क्रमांक १ ब मधुन आपला उमेदवारी अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी आदेश डफल यांच्या कडे सादर करण्यात आले.यावेळी शिंदे गट शिवसेना उपजिल्हाप्रमुख भरत बेलोसे ,शहर प्रमुख संदिप पाटील, अविनाश दांडेकर उपस्थित होते.



# भारत : साहित्य आणि मीडिया महोत्सवाचे मुंबई मराठी पत्रकार संघात आयोजन

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

हिंदीतील पहिले वृत्तपत्र ‘उदण्ड मार्तण्ड’च्या द्विशताब्दी वर्षाच्या निमित्ताने मराठी भाषिक संपादक आणि पत्रकारांचे हिंदी पत्रकारितेच्या विकासातील अनमोल योगदान अधोरेखित करण्यासाठी आयोजित ‘भारत : साहित्य आणि मीडिया महोत्सव’ येत्या १५ व १६ नोव्हेंबर रोजी मुंबईत होत आहे.

मुंबई मराठी पत्रकार संघ, केंद्रीय हिंदी संचालनालय – शिक्षण मंत्रालय (भारत सरकार) आणि महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमी यांच्या सहकार्याने काशी–वाराणसी विरासत फाउंडेशनच्या पुढाकाराने या उपक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. ‘महोत्सवा’चे परिकल्पनाकार व काशी–वाराणसी विरासत फाउंडेशनचे कार्याध्यक्ष प्रा. राममोहन पाठक यांनी सांगितले की, महान राष्ट्रभक्त लोकमान्य बाळ गंगाधर टिळक आणि हिंदी पत्रकारितेचे शलाका पुरुष बाबूराव विष्णु पराडकर यांना अर्पण करण्यात आलेल्या या दोन दिवसीय राष्ट्रीय परिसंवादाच्या उद्घाटन सत्राचे मुख्य अतिथी आसामचे राज्यपाल डॉ. लक्ष्मण आचार्य असतील. महाराष्ट्राचे सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार अध्यक्षस्थानी असतील. आझाद मैदान परिसरातील मुंबई मराठी पत्रकार संघाच्या सभागृहात सकाळी १०.३० वाजता सुरू होणार्या उद्घाटन सत्रात उत्सवमूर्ती म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ, कोलकाता यांच्या कुलगुरू प्रा. सोमा बंधोपाध्याय आणि चेन्नईच्या प्रख्यात हिंदी साहित्यिक डॉ. राजलक्ष्मी कृष्णन या विदुषींचा समावेश आहे. इस्कॉनचे अध्यक्ष प्रभु सूरदास यांचे विशेष आशीर्वचनही या प्रसंगी लाभणार आहे. यावेळी हिंदी पत्रकारिता आणि साहित्यात उल्लेखनीय योगदान देणार्या मराठी पत्रकारांचा सत्कार करण्यात येणार आहे अशी माहिती मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण यांनी दिली. या महोत्सवात केंद्रीय हिंदी संचालनालयाचे संचालक प्रा. हितेंद्र मिश्र, मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण, राज्यसभेचे माजी खासदार डॉ. रवींद्र किशोर सिन्हा यांचीही विशेष उपस्थिती राहणार आहे. रविवार १६ नोव्हेंबर रोजी दुपारी १ वाजता होणार्या समारोपासाठी साहित्य अकादमी (भारत) यांच्या उपाध्यक्षा आणि महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठ, वर्धा यांच्या कुलगुरू प्रा. कुमुद शर्मा प्रमुख पाहुण्या असतील, अशी माहिती मुंबई मराठी पत्रकार संघाचे कार्यवाह शैलेंद्र शिर्के यांनी दिली. काशी–वाराणसी विरासत फाउंडेशनचे सल्लागार व ट्रस्टी शरद कुमार त्रिपाठी यांनी सांगितले.

# म्हसळ्यातील संदेरीत आढळलेली पिल्ले वाघाटीची!

**म्हसळा : प्रतिनिधी**

काल मंगळवार दिनांक १२नोव्हेंबर रोजी सकाळचे सुमारास म्हसळा तालुक्यातील संदेरी येथील जंगलात वाघाटी संकटग्रस्त प्रजातींपैकी मांजर या लाजऱ्या जातीची दोन पिल्ले शेतकऱ्याला मिळाली होती. याचे वृत्त कळताच वनविभागाने पशुधन विकास अधिकारी पूजा चव्हाण यानी घटनास्थळी तात्काळ भेट देऊन दोन्ही पिल्ले तपासून पिल्ले आरोग्य दृष्टया योग्य आसल्या बाबत दाखलाही दिला आहे.

याचवेळी परिसरातील गावांत ती बिबट्याची पिल्लं नसून ती वाघाटी प्रजातींपैकी जंगली मांजरीची पिल्ल आहेत या बाबत खुलासा केला होता. स्थानिकांच्या माध्यमातून सदरचे वृत्त प्रसारमाध्यमांकडे पोचल्यामुळे शेतकऱ्यांची आणि नागरी वस्तीचे सुरक्षिततेसाठी प्रसिद्धी दिली गेली असावी असा वनविभागाने खुलासा केला. मांजरसदृश्य वाघाटी प्रजातींचे वास्तव्य झुडपी जंगले, गवताळ प्रदेश आणि खडकाळ भगांत असते त्यांचे खाद्य मांजरी प्रमाणेच लहान सस्तन प्राणी,सरडे,पक्षी,उंदीर असे असते. त्यांचे वास्तव्य भारत, श्रीलंका आणि नेपाळ या देशांत आढळते. जंगलग्रस्त परिसरातील वस्ती, आदिवासी पाडे,स्थानिक नागरिकांत जनजागृती करण्यात येत आहे.



# खारघरला श्री गुरू तेग बहादूर यांच्या ३५०व्या शहिदी समागम वर्षानिमित्त कार्यक्रम

**अलिबाग :** हिंद– की–चादर श्री गुरु तेग बहादूर साहिब जी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त अतिशय भव्य दिव्य असा कार्यक्रम खारघर येथे दि.२१ डिसेंबर २०२५ आयोजित केला जाणार आहे. श्री गुरु तेग बहादूर यांच्या शहिदी समागम कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्व अधिकाऱ्यांनी समन्वयाने आणि समर्पण भावनेने काम करावे, असे आवाहन रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी उपस्थित संबंधित सर्व अधिकाऱ्यांना आणि समाजाच्या पदाधिकाऱ्यांना केले.

या कार्यक्रमाच्या आयोजनाची पूर्वतयारी बैठक आज पनवेल येथील आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह येथे आयोजित करण्यात आली होती, त्यावेळी ते बोलत होते. या बैठकीस मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक, पनवेल परिमंडळ २ चे पोलीस उपायुक्त प्रशांत मोहिते, नवी मुंबई वाहतूक पोलीस उपायुक्त तिरुपती काकडे, पोलीस विशेष शाखा उपायुक्त रश्मी नांदेडकर, पनवेल महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे, पनवेल प्रांताधिकारी पवन चांडक, धर्मजागरण विभागाचे महेंद्र रायचुरा,अल्पसंख्याक आयोग समिती सदस्य हॅपी सिंग यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी गुरुद्वारा प्रतिनिधी, सामाजिक संस्थेंचे प्रतिनिधी आदींची उपस्थिती होती.

## निवडक

### कदम, मगर यांची नियुक्ती

**पनवेल :** बंकीमचंद्र चटर्जी यांनी १८५७ साली लिहिलेले वंदे मातरम या गीतास स्वातंत्र लढयात तसेच स्वातंत्र्योत्तर कालखंडातही अनन्ययाधारण महत्व प्राप्त आहे. आनंदमठ या कादंबरीतील हे गीत भारतमातेच्या स्तुतीचे प्रतीक असून, स्वातंत्र्य लढयातील असंख्य क्रांतीकारकांना प्रेरणादायी ठरलेले आहे. या गीतास ७ नोव्हेंबर, २०२५ रोजी १५० वर्ष पूर्ण होत आहे. त्यानिमित्ताने शासन निर्णयानुसार, राज्यातील सर्व तालुक्यांमध्ये वंदे मातरम गीताच्या १५० व्या वर्धापन दिनाचे यशस्वी आयोजनासाठी अपर तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखाली तालुकास्तरिय समिती स्थापन करण्यात येत आहे. यामध्ये पनवेलमधील ज्येष्ठ पत्रकार संजय कदम व खारघर येथील ज्येष्ठ पत्रकार आप्पासाहेब मगर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

### बेपत्ता तरुणीचा शोध

**पनवेल :** भाजीपाला आणण्यासाठी नेरे येथे जाते असे सांगून घरातुन निघुन गेलेली एक तरुणी अद्याप घरी



परत आली नाही म्हणून ती हरविल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. तरुणीचे नाव प्रिती यादव कांबळे (वय २०), रंग सावळा, उंची पाच फूट, बाधा मध्यम, नाकात डाव्या बाजूस पिवळ्या धातुची नथ, कैस-लांब काळे, अंगात नेसून लाल रंगाचा पंजाबी ड्रेस, सोबत मोबाईल फोन आहे. ती कियारा फार्म, शांतीवन फाटा नेरे येथुन नेहमीप्रमाणे भाजीपाला आणण्यासाठी नेरे येथे जाते असे सांगून घरातुन निघुन गेली ती घरी परत आली नाही. याबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल तालुका पोलीस ठाणे किंवा पो. हवा अमर भालसिंग यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### वैष्णवी कडूचा विशेष सत्कार

**पनवेल :** भाजपचे उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष गणेश कडू यांची कन्या वैष्णवी कडू हिने फ्लोरिडा येथील मायामी एव्हिएशन संस्थेत कमर्शियल पायलटची ट्रेनिंग पूर्ण करून ती कमर्शियल पायलट बनली आहे. याबद्दल तिचा पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांनी विशेष सत्कार करून तिचे कौतुक केले. या वेळी पोलीस हवालदार माधव शेवाळे, गणेश कडू, दिलीप देशमुख, हसमुख वनवेरु आदींनी तिचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



# फसवणूक आणि चोरीच्या घटनांमध्ये वाढ

## कामोठ्यात तरुणास भामट्याने फसवले

**पनवेल : वार्ताहर**

श्रद्धेचा गैरफायदा घेत साधूपणाचा मुखवटा धारण करणाऱ्या एका भामट्याने कामोठे येथे राहणाऱ्या तरुणाला हिप्नोटाईज करून त्याच्याजवळ असलेली सव्वा लाख रुपये किमतीची सोन्या-हिऱ्याची अंगठी लंपास केल्याची घटना घडली आहे.

एनआरआय सागरी पोलिसांनी साधूच्या वेशात आलेल्या भामट्याविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला आहे. तक्रारदार उदय केंद्रे (३०, रा. पार्क हेवन सोसायटी, से. २१, कामोठे) हा सकाळी सीवूड्स, सेक्टर-४० मधील पोतदार शाळेजवळ कामानिमित्त आले होते. या वेळी उदय त्याच्या कारमधून उतरत असताना एक जटाधारी, काळे कपडे परिधान केलेली व द्राक्षाच्या माळा व भगवी थैली हातात असलेला अनोळखी व्यक्ती त्याच्याजवळ आली. त्यावर भिक्षा मागणाऱ्या या साधूला उदय यांनी १०० रुपयांची नोट दिली. यानंतर या भामट्याने हातचलाखीने त्याच नोटेसह रुद्राक्ष व फूल देत उदय याचा विश्वास संपादन केला. त्यानंतर त्याने उदय यांच्याकडून त्यांच्या हातातील प्लॅटिनमची अंगठी मागून घेतली व ती परत दिली.

त्याला बोलण्यात गुंतवून ही अंगठी काढून घेतली व तेथून पलायन केले. त्यानंतर ही माहिती त्याने त्याच्या मित्रांना दिल्यानंतर त्यांनी एनआरआय सागरी पोलीस ठाण्यात याबाबत तक्रार दाखल केली.

## पनवेल परिसरात तीन ठिकाणी घरफोडी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरासह, खांदेश्वर वसाहत आणि खारघर उपनगर येथे तीन वेगवेगळ्या घडफोडीच्या घटना घडल्या आहेत. याबाबतच्या तक्रारी संबंधित पोलीस ठाण्यात आल्या आहेत.

पनवेल शहरातील टिळक रस्त्यावरील मॅस्ट्रो वास्तू दुकानातून दुकानदाराने दुकान बंद केल्यावर रात्रीच्या वेळी दुकानाच्या छताचे पत्रे तोडून दुकानातील नवरत्न स्टोन आणि रोख रक्कम असा एक लाख ६५ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरला. अशीच स्थिती खांदेश्वर वसाहतीची आहे. मध्यरात्री सेक्टर १५ येथील प्रजापती आर्केड या इमारतीमधील गाळा क्रमांक १०मधील हॉटेलचे शटर तोडून ७० हजार रुपयांची चोरी केली. तर खारघर उपनगरात मध्यरात्री सेक्टर ३५ या रेझा ग्रॅन्ड ओव्हर या इमारतीची सुरक्षा यंत्रणा चांगली आहे, मात्र या इमारतीच्या मागील मोकळ्या जागेवरून प्रवेश करत, चार चोरटे इमारतीमधील वाहनतळात शिरले.

पहाटे चार वाजता सुरक्षारक्षक झोपले असताना चोरांनी सोसायटीतील तिसऱ्या मजल्यावरील सदनिकेत प्रवेश केला. या घरातील गृहिणी आणि त्यांच्या दोन मुली झोपल्या असताना घरात काहीतरी हालचाल झाल्याचे या महिलेच्या ध्यानात आले. चोरटे त्यांच्या घरात खिडकीवाटे शिरल्याचे बाहेर पडताना पाहिले. यानंतर सीसीटीव्ही चित्रीकरण तपासल्यावर चोरट्यांनी वाहनतळात शिरल्यानंतर शिडीवाटे तिसऱ्या मजल्यावरील घरात प्रवेश करून मोबाइल व पन्नास हजार चोरले. याबाबतच्या तक्रारी संबंधित पोलीस ठाण्यात आल्या असून अधिक तपास सुरू आहे.

## स्टील खरेदीत सव्वा पाच लाखांचा गंडा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

स्टीलसाठी दिलेले पाच लाख १४ हजार ४०० रुपये परत न करता फसवणूक केल्या प्रकरणी अनोळखी व्यक्तीविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

पनवेल येथील संतोष शंकर अस्वले यांचा बिल्डिंग मटेरियल सप्लायरचा व्यवसाय आहे. त्यांना नऊ टन टाटा स्टीलची ऑर्डर मिळाली. डीलर कडे टाटा स्टील उपलब्ध नसल्याने त्यांनी गुगलवर व्यक्ती आणि एजन्सी सर्च केली असता मोबाईल नंबर मिळाला. संपर्क केला असता या वेळी समोरील व्यक्तीने पाच लाख १४ हजार ४०० रुपयांचे बिल पाठवले. आणि त्यानंतर संतोष यांनी आरटीजीएस द्वारे पेमेंट केले. दुसऱ्या दिवशी समोरील इसमाने लहान ऑर्डर साठी डिलिव्हरी होऊ शकत नाही, १५ ते १८ टन ऑर्डर केल्यास डिलिव्हरी केली जाईल अन्यथा ऑर्डर ब्लॉक करून पैसे परत केले जातील असे सांगितले. त्यावेळेस संतोष यांनी पैसे परत करण्यास सांगितले. त्यावेळी २४ तासात पैसे येतील असे सांगितले. त्यानंतर संतोष यांनी बँकेत जाऊन चौकशी केली असता समोरील इसमाचे नाव विनोद कुमार व मेरठ येथील बँक असल्याचे समजले. त्यांनी आरटीजीएस केलेले पाच लाख १४ हजार ४०० रुपये परत आले नाहीत. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आला.

## आयफोनच्या खरेदीत कोट्यवधी गमावले

**पनवेल : वार्ताहर**

आयफोनचा व्यवसाय करणाऱ्या एका व्यापाऱ्याने ६०० आयफोन खरेदीच्या ऑर्डरमध्ये झालेल्या फसवणुकीत दोन कोटी ७५ लाख रुपये गमावल्याची घटना पनवेलमध्ये घडली आहे. याबाबत चार जणांविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवला आहे.

पनवेल शहरातील ४९ वर्षीय व्यापारी विशाल ट्रेडिंगचा व्यवसाय करतात. ऑगस्ट महिन्यात संबंधित व्यापाऱ्याने ६०० मोबाईल फोन निर्यातीकरिता ऑर्डर दिली होती. या आयफोनची किंमत दोन कोटी ७५ लाख ५७ हजार एवढी असून संबंधित व्यापाऱ्याने कंपनीला रक्कम दिल्यानंतरही मोबाइल फोन मिळत नसल्याने व्यापाऱ्याने दिलेल्या रकमेचा परतावा मागितला. यानंतरही कोणताही प्रतिसाद मिळत नसल्याने व्यापाऱ्याने पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवण्यात आली.

राजस्थान राज्यातील चार जणांविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात पावर पॉईंट प्रेझेंटेशन स्पर्धा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात गुरुवारी (दि.१३) माहिती तंत्रज्ञान विभागातर्फे विद्यार्थ्यांसाठी पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन स्पर्धेचे आयोजन केले होते.



या स्पर्धेत एकूण ४५ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला व विद्यार्थ्यांनी विविध विषयांवर उत्कृष्ट सादरीकरणे करून आपले तांत्रिक ज्ञान आणि सर्जनशीलता प्रदर्शित केली. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रा. विशाल देशमुख यांनी महत्त्वाची भूमिका बजावली व स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे घोषित करण्यात आला, प्रथम क्रमांक: गौरव गुप्ता (टी. वाय.आय.टी.), द्वितीय क्रमांक: ऐफाझ इनामदार, तृतीय क्रमांक: हर्ष कारपेंटर, उत्तेजनार्थ पारितोषिक: तौहीद खुंदालिक या विद्यार्थ्यांनी पटकाविला. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी सर्व विजेत्यांचे तसेच सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.

या स्पर्धेचे आयोजन प्रा. मनीषा शिलेदार यांनी केले तसेच प्रा. राजश्री म्हात्रे (प्रमुख, माहिती तंत्रज्ञान विभाग) तसेच विभागातील इतर सर्व प्राध्यापक विद्यार्थी शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले. कार्यक्रमाच्या शेवटी विजेत्यांना पारितोषिके देण्यात आली आणि सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले.



**पनवेल : भाजपचे ओबीसी मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस यतिन पाटील यांना वाढदिवसानिमित्त भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी माजी जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, पनवेल पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, पनवेल उत्तर मंडळ अध्यक्ष दिनेश खानावकर, युवा मोर्चा तालुका सरचिटणीस विश्वजीत पाटील, नवीन पनवेल अध्यक्ष मयुर कदम, ॲड. पवन भोईर आदी उपस्थित होते.**

## गव्हाण येथे रस्ते कामाचा शुभारंभ



**उरण : रामप्रहर वृत्त**

गव्हाण ग्रामपंचायत येथे अंतर्गत रस्ता तयार करण्याच्या कामाचा शुभारंभ करण्यात आला. आमदार महेश बालदी यांनी मंजूर केलेल्या गौण खनिज योजनेंतर्गत हे काम होत आहे.

या वेळी माजी उपसरपंच विजय घरत, भाऊशेठ पाटील, हेमंत ठाकूर, जयवंत देशमुख, माजी ग्रामपंचायत सदस्य योगीता भगत, शाम ठाकूर, प्रकाश देशमुख, विराज देशमुख, अशोक कडु, सुहास भगत, प्रदीप ठाकूर, गणेश पाटील, उषा देशमुख, प्रदीप ठाकूर, कंत्राटदार मयूर ठाकूर (विदुला एंटरप्रायजेस) आदी उपस्थित होते.

## अज्ञात वाहनाची स्कूटीला धडक; महिलेचा मृत्यू

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अज्ञात वाहनाने स्कूटीला दिलेल्या धडकेत महिलेचा मृत्यू झाल्याची घटना राहुल पार्क हॉटेल, पळस्पे येथे घडली.

प्रियांशू त्रिपाठी हे शिखर ग्रीन सोसायटी, रसायनी पनवेल येथे राहत असून दहा नोव्हेंबर रोजी ते त्यांची आई रंजीता त्रिपाठी (वय ४२) हे रात्री साडेआठच्या सुमारास उलवे येथून एक्टिवा स्कुटी क्रमांक एम एच ४३ बीआर १८४७ ने राहत्या घरी शिखर ग्रीन सोसायटी, रसायनी येथे जाण्यासाठी निघाले. ते राहुल पार्क हॉटेल, पळस्पे येथे आले असता पाठीमागून आलेल्या अज्ञात वाहनाने त्यांच्या स्कुटीला धडक दिली. त्यामुळे त्यांचा गाडीवरचा ताबा सुटला आणि त्यांची आई रस्त्यावर खाली पडली.

तिच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. त्यांना गांधी हॉस्पिटल, पनवेल येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस अधिक तपास करत आहेत.

## आसुडगाव बस डेपोजवळील गटारांच्या नूतनीकरण कामाचे भूमिपूजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आसुडगाव येथील बस डेपोजवळील गटारांचे नुतनीकरण करण्यात येणार आहे. या कामाचे भूमिपूजन पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते बुधवारी झाले.



पनवेल महापालिका हद्दीमध्ये आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली अनेक विकासाची कामे मार्गी लागत असून नागरीकांना विविध सुविधा मिळत आहेत. त्याअंतर्गत माजी नगरसेविका चंद्रकला शशिकांत शेळके यांच्या प्रयत्नांमुळे प्रभाग समिती ब, सेक्टर २ आसुडगाव बस डेपो, खांदा कॉलनी येथील आर.सी.सी गटारांचे नुतनीकरण महापालिकेच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. या कामाचे भुमीपूजन माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते झाले.

या वेळी माजी नगरसेवक एकनाथ गायकवाड, नवीन पनवेल मंडळ अध्यक्ष दशरथ म्हात्रे, माजी उपनगराध्यक्ष गणेश पाटील, भाजपनेते शशिकांत शेळके, भिमराव पोवार, मोतीराम कोळी, सचीन गायकवाड आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.



**पनवेल : रोडपाली येथील गुरुनाथ पाटील यांचा मुलगा शिवम याच्या विवाहनिमित्त महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट देत शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजप कळंबोली मंडळ अध्यक्ष अमर पाटील, माजी अध्यक्ष रविनाथ पाटील, माजी नगरसेविका प्रमिला पाटील आणि गुरुनाथ पाटील यांचे कुटुंबीय उपस्थित होते.**

## उरण पालिका निवडणुकीसाठी भाजप महायुतीचे अर्ज दाखल

















## संपादकीय

# उच्चशिक्षित दहशतवादी!

गरीब घरांतील वैफल्यग्रस्त तरुणांच्या परिस्थितीचा गैरफायदा घेऊन त्यांना कट्टरतावादाच्या प्रभावाखाली आणले जाते आणि दहशतवादासाठी उद्युक्त केले जाते असा समज आजवर साधारणपणे प्रचलित होता, परंतु दिल्लीतील बॉम्बस्फोटानंतर त्यामागे उच्चशिक्षित व्यक्तींचा हात असल्याचे समोर आल्याने दहशतवादाचा पांढरपेशा चेहरा ठळकपणे उजेडात आला आहे. अभ्यासक मात्र यात आश्चर्य वाटण्याजोगे काही नाही असे म्हणत असून आंतरराष्ट्रीय दहशतवादी संघटनांनी नेहमीच उच्चशिक्षित व्यक्तींना आपल्या नेटवर्कमध्ये महत्त्वाच्या जागी नेमले आहे याकडे ते लक्ष वेधतात.

**दिल्लीतील लाल किल्ल्यानजीकच्या बॉम्बस्फोटानंतर त्यामागे उच्चशिक्षित डॉक्टरांचा हात असल्याचे समोर आले. यातून उच्चशिक्षित व्यक्ती अशा दहशतवादी कारवायांमध्ये का सहभागी होत असाव्यात याची चर्चा सुरू झाली आहे. गेल्या काही वर्षांत दहशतवादी कटकारस्थाने तसेच सायबर गुन्ह्यांमध्ये उच्चशिक्षित अभियंत्यांचा सहभाग दिसून आला आहे. आता डॉक्टरही दहशतवादी विचारसरणीने हिंसक कारवायांमध्ये गुंतलेले दिसत आहेत. २००८च्या मुंबईतील दहशतवादी हल्ल्यात सुरक्षा यंत्रणांच्या हाती लागलेला एकमेव दहशतवादी अजमल कसाब हा आजवरच्या दहशतवाद्याच्या प्रतिमेत चपखल बसणारा होता. तो तरुण होता, पाकिस्तानातील गरीब, ग्रामीण भागातील होता. दहशतवाद्याची आजवरची रूढ प्रतिमा हीच होती. गरीब घरांतील तरुणांचा गैरफायदा घेऊन त्यांना कट्टरतावादाच्या प्रभावाखाली आणले जाते आणि दहशतवादी कारवायांसाठी उद्युक्त केले जाते असे सर्वसाधारणपणे मानले जाई, पण नवी दिल्लीतील बॉम्बस्फोटानंतर पोलिसांनी देशातील अनेक राज्यांत पसरलेले व देशाबाहेरही जोडले गेलेले उच्चशिक्षित पांढरपेशा दहशतवाद्यांचे जाळेच उघडकीस आणले आहे. हे सारे अद्याप संशयित असले तरी लाल किल्ल्याजवळच्या बॉम्बस्फोटाच्या कटात डॉक्टर व कट्टरपंथी व्यावसायिक सामील असल्याचे दिसते आहे. यांचा 'जैश-ए-मोहम्मद'सारख्या दहशतवादी संघटनांशी संबंध दिसतो आहे. वैद्यकीय सेवेसारख्या प्रतिष्ठित व्यवसायातील व्यक्तींचा या दहशतवादी कटातील सहभाग अनेकांना आश्चर्यचकित करून गेला आहे. स्फोट झालेली आय-२० कार चालवणारा उमर उन नबी हा मूळचा पुलवामा येथील असून फरिदाबादमधील अल-फलाह विद्यापीठाशी संबंधित होता. स्फोटकांची वाहतूक आणि साठवणुकीसंदर्भात तो डॉ. मुझम्मिल गनी आणि डॉ. आदिल यांच्या संपर्कात होता. डॉ. मुझम्मिल फरिदाबादमधील अल-फलाह विद्यापीठात प्राध्यापक होता. तो एमबीबीएसच्या विद्यार्थ्यांना शिकवत असे. फरिदाबादमधील त्याच्या घरातून ३५८ किलो अमोनियम नायट्रेट, एक रायफल, तीन मॅगझिन, पिस्तुल व बॉम्ब तयार करण्याचे साहित्य हस्तगत केले गेले आहे. डॉ. आदिल अहमद राथेर हा काश्मीरमधील कुलगामचा आहे. तोही अल-फलाह विद्यापीठात काम करत होता. पूर्वी तो श्रीनगरमधील सरकारी हॉस्पिटलमध्ये वरिष्ठ निवासी डॉक्टर होता. तेथील त्याच्या लॉकरमधून एके-४७ रायफल जप्त करण्यात आली आहे. याच नेटवर्कमधील डॉ. शाहीन सईद या महिला डॉक्टरचा सहभाग अनेकांना अधिक आश्चर्यकारक वाटला. मूळच्या लखनऊच्या डॉ. शाहीन हिच्या कारमध्ये असॉल्ट रायफल सापडली आहे. तर डॉ. अहमद मोहियुद्दीन सय्यद याला गुजरात एटीएसने ८ नोव्हेंबरलाच अटक केली होती. तो आंतरराष्ट्रीय दहशतवाद्यांच्या संपर्कात होता. अन्य एक डॉ. सज्जाद मलिकला पुलवामातून अटक करण्यात आली आहे. या साऱ्यांचे तपशील वरकरणी आश्चर्यकारक वाटले तरी आंतरराष्ट्रीय दहशतवादी संघटनांनी तंत्रज्ञानकुशल, उच्चशिक्षित व्यक्तींना कायमच नेतृत्वाच्या पदांवर नियुक्त केल्याचे तज्ज्ञ सांगतात. कुठल्याही आर्थिक स्तरांतील व्यक्ती अतिरेकी कारवायांशी जोडलेल्या असू शकतात हेच यातून दिसते.**

# अलिबाग शहरात कचरा समस्या गंभीर



**खबरबात**
**प्रकाश सोनवडेकर**

अलिबाग हे रायगड जिल्ह्याच्या मुख्यालयाचे शहर आहे; त्याचबरोबर ते एक पर्यटनस्थळदेखील आहे. रायगड जिल्ह्यातून आपल्या कमासाठी हजारो लोक अलिबागला येत असतात. पर्यटकदेखील येत असतात. या शहारात सद्या अनेक समस्या आहेत. उनाड जानावरे, मोकाट फिरणारी कुत्री, घोडे, सांडपाण्याचा निचरा, कचरा व्यवस्थापन अशा अनेक समस्या आहेत. त्यापैकी सर्वात महत्वाची समस्या आहे ती कचरा व्यवस्थापनाची. कचऱ्याचे व्यवस्थापन योग्य प्रकारे होत नसल्यामुळे शहारात कचऱ्याचा ढिग साचला आहे. 'स्वच्छ अलिबाग सुंदर अलिबाग' फक्त भिंतीवर रंगवण्यापुरतेच मर्यादित आहे. सद्या कचरा उचलला जात असला तरी ही तात्पपूर्ती उपाययोजना आहे. कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी अलिबाग नगर परिषदेसाठी डंपिंग ग्राऊंड तयार करावे लागेल.

शहरातील अनेक भागात आठवडाभर कचराच उचलला जात नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याच्या परिसरात आणि सतीश इंजिनिअरिंग समोरील रस्त्यावर पाणी साठते. त्यावर कायमस्वरूपी उपया अजुन शोधला गेला नाही. परिणामी ४ महिने नागरिकांना घाणेरड्या पाण्यातून चालावे लागते.

अलिबाग रेवदंडा रस्त्यावरील हद्दीपासून नगरपरिषद कार्यालयापर्यंतच्या पश्चिमेकडील भागात कांदळवनावर मोठ्या प्रमाणावर कचरा टाकलेला आहे. कांदळवनाचा नाश करणे हा गुन्हा असून त्यात नगरपरिषद सामील असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. अलिबाग नगरपरिषदेने २०२४-२५ या वर्षातमध्ये शहर स्वच्छतेसाठी २ कोटी ७४ लाख रुपये खर्च केल्याचे टेंडरवरून कळते. तर, २०२५-२६ साठी अंदाजे ३ कोटी ३२ लाख रुपये खर्च अपेक्षित आहे. म्हणजे दररोज किमान ९१ हाजार रूपये कचर्यावर खर्च होणार आहे. कचरा काढण्याचे काम करणार्या ठेकेदाराची माणसे कोणते रस्ते झाडतात, हा संशोधनाचा विषय आहे.

एसटी स्टँडसमोरून व्यायामशाळेत जाणाऱ्या गल्लीतील भाजी विक्रेत्या महिलांच्या परिसरातील मुतारीची अवस्था दयनीय आहे, ज्यामुळे त्यांना नरकयातना सहन कराव्या लागतात. अनेक ठिकाणी व्यापाऱ्यांनी दुकानातील माल रस्त्यालगत ठेऊन रस्त्याचा वापर दुकान म्हणून केला आहे. शहराच्या अनेक नाक्यांवर कर्तृत्ववान व्यक्तींचे होर्डिंग्ज अनेक दिवस तसेच असतात, ज्यामुळे शहराचे विद्रुपीकरण होते आणि काही होर्डिंग्जमुळे अपघातांचा धोका वाढतो.

शहराला सध्या उनाड घोडे, भटके कुत्रे व मोकाट गुरांची समस्या मोठी डोकेदुखी झाली आहे. अलिबाग शहरातील गल्ली बोळात कुत्र्यांची प्रचंड दहशत निर्माण झाली आहे. रस्तावर एकाच वेळी दहा ते पंधरा कुत्रे टोळीने फिरत असतात. टोळीने फिरणारे हे कुत्रे अपघातास कारणीभूत ठरत आहेत,शिवाय अश्या टोळीने जर एखाद्यावर हल्ला झाल्यास त्याला आपल्या प्राणास मुकावे लागेल याचा विचार अलिबाग नगरपरिषदेने केला पाहिजे.कुत्र्यांची ही वाढती संख्या मर्यादित करण्यासाठी त्यांचे निर्बीजीकरणं करणे काळजी गरज आहे. नगरपालिका प्रशासनाने यासाठी पुढाकार घेऊन या भटक्या कुत्र्यांची दहशत मोडून काढण्यासाठी मोहीम राबवायला हवी.

अलिबाग शहरात मोकाट गुरांचा संचार मोठ्या प्रमाणात वाढला आहे. ही गुरे रस्त्यात कुठेही ठाण मांडून बसत असल्याने वाहतुकीलाही अनेकदा अडथळा निर्माण होतो. अलिबाग शहरातील मुख्य रस्ता, बाजारपेठ, एसटी आगार आदी परिसरात १५ ते २० गुरे झुंडीने फिरताना दिसतात, तर कधी रस्त्यावर विसावलेली दिसून येतात. रस्त्यावर ठाण मांडून बसलेल्या या गुरांमुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होतो. परिणामी नागरिकांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे. गुरांचे मालक गुरे सोडून देतात. त्यामुळे ही गुरे शहरात भटकत राहतात. अलिबाग नगर परिषद मोकाट गुरांच्या प्रश्ना वर सद्या हतबल झालेली दिसून येत आहे. या उनाड गुरांमुळे अनेक अपघात झाले आहेत. नगरपरिषदेने याकडे लक्ष देऊन या मोकाट गुरांचा बंदोबस्त केला पाहिजे.

अलिबागचा समुद्रकिनारा हे पर्यटकांचे आकर्षण, परंतु या किनाऱ्यावर घोड्यांच्या लिदीमुळे पर्यटक येथे थांबत नाहीत. लिदीमुळे पर्यटकांच्या व नागरिकांच्या आरोग्याचे प्रश्नही निर्माण होऊ लागले आहेत. शहरात फिरणाऱ्या मोकाट घोड्यांमुळे अनेक समस्या निर्माण होत आहेत. अनेकदा किनारा परिसरात घोड्यांमुळे वाहतुकी कोडी होते. ओहोटीच्या वेळी धंदा करायचा आणि समुद्राला भरती आल्यानंतर घोडे मोकाट सोडून दिले जातात. त्यामुळे शहारात उनाड घोड्यांची समस्या निर्माण झाली आहे.

# रंगभूमी माझ्या अंतरंगातली, मनातला तू...

रंगभूमीवर वेगवेगळे मुखवटे परिधान करून कलाकार भूमिका साकारत असतो. आयुष्याचंही असंच आहे. आयुष्यसुद्धा ही एक रंगभूमी आहे. जन्मलेला प्रत्येकजण कोणती ना कोणती भूमिका बजावत असतो. नाट्यरंगाभूमीत भूमिका निवडीचं स्वातंत्र्य असतं, तर आयुष्याच्या रंगभूमीत जी भूमिका मिळेल ती करावीच लागते इच्छा असो वा नसो. अभिनय मात्र दोन्हीकडे चोख करावा लागतो.

आयुष्याच्या या रंगभूमीत एक स्त्री म्हणून जगताना मुलगी, आई, बायको, सून, संसारासोबत मिळालेल्या अनेक भूमिका व त्यांचा अभिनय करताना होणारी धावपळ, प्रत्येक भूमिकेला योग्य न्याय देण्याच्या नादात स्वतः चीच होणारी ससेमीरा याची आता सवय झाली आहे, पण वयाच्या एका टप्प्यावर पोहचल्यावर लक्षात आलं की, वेगवेगळ्या भूमिका करण्याच्या गडबडीत मी स्वतःला विसरूनच गेले. माझ्या स्वतःच्या भूमिकेचा अभिनय करायचा राहूनच गेला. आता मला माझ्या मनातल्या रंगाभूमीला न्याय द्यायचा आहे. डोळे बंद करून माझ्या विश्वात डोकावल्यावर तिथे मला तू दिसलास... हो तूच... माझ्या मनातला तू... काय हवं असतं एका स्त्रीला पैसा, चैन, सुखसोयी की, स्वतः वर मनापासून प्रेम करणारं कुणीतरी आपला माणूस...? मनातला तूसुद्धा असाच आहेस. तुझी चित्राकृती अजूनही धुसरच आहे. तरीही तू खूप छान आहेस. अगदी मला हवा तसा तू... रंगभूमी माझ्या अंतरंगातली मनातला तू..... कोण आहेस मला माहिती नाही, पण तुझ्या नुसत्या विचारानेही मी खुलते... तुझ्या अवतीभवती असण्याने उन्मेषाने फुलते.

संसाराच्या राहाटगाड्यात तुझ्या नुसत्या जाणीवेने सुखाच्या सरी बरसतात. कशाचाही क्षीण वाटत नाही. तुझं स्थान हारातील धाग्याप्रमाणे आहे. त्याचं दिसणं महत्वाचं नाही, तुसुद्धा तसाच आहेस. तुझं दिसणं नाही तर माझ्या आयुष्यातील असणं महत्वाचं आहे. कदाचित म्हणूनच आजपर्यंत तुझा चेहरा स्पष्ट झालेला नाही. तुला कागदावर उतरवूनसुद्धा तू नक्की कसा आहेत हे मी ओळखू शकले नाही.

प्रत्येकवेळी तुझ्या स्वभावाचा नवा-वेगळा पैलू समोर येतो आणि मी पुन्हा हरवून जाते. पुन्हा नव्यानं सुरू होतो तुझा शोध. असंख्य प्रश्न पिंगा घालतात, वाटतं माझ्या मनातला तू कधी भेटलास तर ओळखू शकेन का मी तुला...? का आपली भेट होऊन तू निघूनही गेलास ...? काहीच कळत नाही. तरीही तू उरतोस मनात...साठवला जातोस कणाकणात.... नसानसातून वाहतोस शरीरभर....खळखळत्या पाण्याप्रमाणे उतरतोस कागदावर..... अजरामर होतोस मनाच्या गाभाऱ्यात नी विश्वाच्या पसाऱ्यात. हे सर्व केव्हा घडतं माहिती आहे का तुला. जेव्हा अंतरंगातील रंगाभूमीवर मी माझी स्वतःची भूमिका निसंकोचपणे तितक्याच निखळपणे वठवत असते.

आयुष्याच्या वास्तव रंगभूमीवर चोख अभिनय करण्यासाठी मनातल्या अंतरंगतील रंगाभूमी नेहमीच सोबत करणार आहे, हे माहिती आहे मला. म्हणूनच मनातल्या तुझ्याविषयी एक अनामिक ओढ व आत्मीयता वाटते.

**-ऋतुजा म्हात्रे-महामुनी**

## बदलते तंत्रज्ञान

# युट्यूबवर सर्वात जास्त कोणत्या गोष्टी सर्च केल्या जातात?



अगदी प्रत्येक वयोगटातली लोक युट्यूबवरवर आपल्या आपल्या आवडीनुसार व्हिडीओ सर्च करून बघतात. लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत सर्वचजण युट्यूबवर व्हिडीओ पाहतात यावरून युट्यूबच्या लोकप्रियतेचा अंदाज लावता येतो. आपल्याला काहीही शोधायचे असेल किंवा काही शिकायचे असेल तर आपण लगेच युट्यूब उघडतो.

युट्यूबवर तुम्हाला प्रत्येक विषयावर अनेक व्हिडीओ मिळतील, जे तुम्ही तुमच्या आवडीनुसार आणि गरजेनुसार बघू शकता. युट्यूबवर काहीही शोधणे खूप सोपे आहे आणि यामुळेच आज आजी-आजोबांच्या वयातील लोक देखील युट्यूबवर चांगला वेळ घालवतात.

युट्यूबवर अनेक गोष्टी सर्च केल्या जात असल्या तरी जर आपण सर्वाधिक सर्च केल्या गेलेल्या विषयाबद्दल बोलले, तर म्युझिक व्हिडीओचे नाव पहिले येते. लोक त्यांच्या आवडीनुसार आणि ट्रेंडनुसार युट्यूबवर संगीत व्हिडीओ शोधतात.

आजकाल प्रत्येकाला आपली छोटी-छोटी कामे स्वतःहून पूर्ण करायची असतात. अशा परिस्थितीत DIY व्हिडीओ युट्यूबवर खूप शोधले जातात, जिथे तुम्हाला घरच्या कामापासून ते केसांच्या काळजीपर्यंत सर्व काही घरबसल्या शिकायला मिळते.

गेमिंग व्हिडीओदेखील युट्यूबवर सर्वाधिक शोधल्या गेलेल्या गोष्टींपैकी एक आहेत. येथे तुम्हाला नवीन गेम आणि त्यांच्याशी संबंधित सर्व माहिती सहज मिळू शकते.सध्या युट्यूबवर ब्लॉगिंगचा खूप ट्रेंड आहे. सेलिब्रिटींपासून सामान्य लोकांपर्यंत प्रत्येकजण येथे त्यांच्या दैनंदिन जीवनाबद्दल ब्लॉग बनवतो. लोकांना टाईमपास करण्यासाठी युट्यूबवर असे ब्लॉग पाहायला आवडतात.

मेकअप आणि हेअर स्टाइल व्हिडीओदेखील युट्यूबवर सर्वाधिक शोधल्या गेलेल्या गोष्टींपैकी एक आहेत.

# प्रसिद्ध चित्रकार रघुवीर मुळगावकर



**निमित्त**


रघुवीर मुळगावकर यांचा आज स्मृतिदिन. त्यांचा जन्म १४ नोव्हेंबर १९१८ रोजी गोव्यातील अस्नोडा येथे झाला. त्यांचे वडील शंकर मुळगावकर हेही चित्रकार होते. त्यांचे मूळ आडनाव राजाध्यक्ष होते. गावाच्या नावावरून त्यांनी ते मुळगावकर असे केले. शंकररावांनी गोव्यात चित्रकलेचा एक वर्ग चालवला होता. रघुवीर मुळगावकरांचा थोरला भाऊदेखील चित्रकलेत पारंगत होता, पण दुर्दैवाने तो अल्पायुषी ठरला. पुढे रघुवीर यांनी वडिलांचा चित्रकलेचा वारसा सांभाळला. मुळगावकरांच्या शेजारी प्रसिद्ध चित्रकार ए.एक्स. त्रिंदाद (त्रिनिदाद) राहत. लहानपणी रघुवीर त्यांची चित्रे न्याहाळत बसत असत. त्रिंदादांनीही या मुलातील कलागुण हेरले व शंकररावांना रघुवीरास चित्रकला शिक्षणासाठी मुंबईला धाडण्यास सांगितले.

रघुवीर मुळगावकर मुंबईला आले. त्या काळात चित्रकार एस.एम. पंडित यांचे नाव कलाक्षेत्रात प्रसिद्ध होते. चित्रपट, पोस्टर, कॅलेंडर या माध्यमांतून पंडितांची कला लोकांना परिचित होती. मुळगावकरांनी मुंबईला आल्यानंतर काही काळ एस.एम. पंडितांकडे काढला. मुळगावकरांनी एकलव्याप्रमाणे पंडितांचे काम न्याहाळत त्यांची शैली जवळून अभ्यासली.

नंतर मुळगावकर गिरगावात स्थायिक झाले. तेथे कुलकर्णी ग्रंथागार, केशव भिकाजी ढवळे, ग.पां. परचुरे, रायकर यांच्या प्रकाशनांच्या पुस्तकांच्या वेष्टनांची कामे मिळू लागली. तो काळ मराठी साहित्यातला सुवर्णकाळ म्हणून ओळखला जातो. पुस्तके, नियतकालिके यांच्यासोबत कॅलेंडरही मोठ्या प्रमाणात प्रकाशित होत असत. बहुतांश देवदेवतांची असणारी त्यांवरील चित्रे मुळगावकरांच्या कुंचल्याने नटू लागली. पूर्वीच्या पिढीत राजा रविवर्म्याने देवदेवतांची चित्रे काढून घरोघरी चित्रकलासंस्कार पोहचवण्याचे जे काम केले, तेच मुळगावकरांनी पुढे नेले. प्रल्हाद केशव अत्रे, विनायक दामोदर सावरकर, पु.ल. देशपांडे, चिं.वि. जोशी, अ.वा. वर्टी यांच्यासह अनेक साहित्यिकांच्या पुस्तकांची मुखपृष्ठे मुळगावकरांच्या कुंचल्याने सजली. त्याचप्रमाणे दीपलक्ष्मी, धनुर्धारी, वसंत, अनुप्रिता, नंदा, माधुरी, माणिक, अलका, पैंजण अशा अनेक नियतकालिकांची व त्यांच्या दिवाळी अंकांची मुखपृष्ठे मुळगावकरांच्या कुंचल्याने साकारली.

मुळगावकरांनी देवदेवतांप्रमाणे काही व्यक्तिरेखाही अमर केल्या. बाबुराव अर्नाळकरांचे धनंजय, छोटू, झुंझार-विजया, काळापहाड, धर्मसिंग, चारुहास आदी गुप्तहेर मुळगावकरांनी साकारले होते. धनंजय वगैरे पात्रे काल्पनिक असूनही वाचकांना ती खरीखुरी वाटत. मुळगावकरांनी कथाचित्रेही अमाप काढली. विशेषत: हाफटोनमधील वॉश चित्रे असोत वा सरळ रेषांमध्ये काढलेली रेखाचित्रे, कृष्णधवल रंगांतील त्यांची कथाचित्रे देखणी असत. या कृष्णधवल रंगांमध्ये अनेक पौराणिक व ऐतिहासिक चित्रमालिका त्यांनी प्रसिद्ध केल्या. त्यामध्ये गणेश पुराण, रामायण, महाराष्ट्रातील संत आदी मालिका लोकप्रिय झाल्या. मुळगावकरांची 'स्प्रे' या माध्यमावर जबरदस्त पकड होती. त्यांनी या माध्यमाचा वापर मोठ्या कुशलतेने केला. अशा या महान चित्रकाराचे ३० मार्च १९७६ रोजी निधन झाले. (साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# सकाळच्या वेळी 'या' पेयाने करा दिवसाची सुरुवात

जसजसे हिवाळ्याचे महिने सुरू होतात, तसतसे सर्दी, घसा खवखवणे सुरू होते. झोपेतून उठल्यावर नाक बंद आणि घशात खरखरीत वाटणे अशा अनेक समस्या जाणवू लागल्या आहेत. त्यामुळे संपूर्ण दिवस खूप थकल्यासारखे होते. मग अशा वेळी सकाळी दिवसाची सुरुवात चहा-कॉफीने करण्याऐवजी एक कप लिंबू अन् लवंगाचे कोमट पाणी पिऊन बघा. खोकला आणि सर्दीसाठी हा एक घरगुती उपाय आहे; ज्याचे फायदे तुम्हाला आश्चर्यचकित करू शकतात.



हे साधे पेय सर्दीच्या लक्षणांपासून मुक्त करण्याप्रमाणेच वजन व्यवस्थापनासही साह्यभूत ठरू शकते का याबद्दल एमजीएम हेल्थकेअरच्या प्रमुख आहार व आरोग्य तज्ज्ञ विजयश्री एन. यांनी माहिती दिली.

तुम्ही सकाळी कॉफीची जागा लिंबू व लवंगयुक्त पाण्याने घेतल्यास तुम्हाला कॅफिन मिळणार नाही, दूध व साखर असलेल्या एका सामान्य कॉफीमध्ये सुमारे १०० ते २०० कॅलरीज असतात; तर लिंबू व लवंगाच्या पाण्यात एक चमचा मध घातल्यास, त्या पेयात केवळ सुमारे २० कॅलरीज मिळू शकतात. याशिवाय लिंबू व लवंगाचे खूप फायदे आहेत. विशेषत: जेव्हा तुम्हाला सर्दीची लक्षणे जाणवत असतील किंवा घसा खवखवत असेल तर आणि थंडीची लक्षणे जाणवत असताना दिवसातून दोनदा म्हणजेच सकाळी आणि संध्याकाळी लिंबू व लवंगाचे पाणी पिण्याची शिफारस केली आहे.

पाण्यात लवंग उकळून घ्या. लिंबाचा रस आणि मध घालण्यापूर्वी तुम्ही उकळवलेले पाणी थंड होऊ द्या. क जीवनसत्त्व टिकवून ठेवण्यासाठी आणि कडूपणा टाळण्यासाठी पाणी गरम असताना लिंबू घालणे टाळा. आरामदायक प्रभाव आणि संतुलित चवीसाठी एक चमचा मध घाला.जर तुम्हाला सर्दी, खोकला किंवा घसा खवखवत असेल, तर साधारण सात ते १० दिवस दररोज हे पेय प्यावे. व्यक्तींनी हा उपाय करताना काळजी घेणे गरजेचे आहे.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com

## श्रीवर्धनमध्ये राजकीय पक्षांसह अपक्ष, हौसे, नवसेही सक्रिय

# उमेदवारी अर्ज भरण्यासाठी धावपळ

**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन नगर परिषदेच्या निवडणुकीसाठी जोरदार हालचालींना वेग आला आहे. अनेक राजकीय पक्षांच्या उमेदवारांसह, अपक्ष उमेदवार, त्याचप्रमाणे हौसे, नवसे यांनी कुठून आपल्याला संधी मिळते का? हे पाहून उमेदवारी अर्ज भरण्यासाठी धावपळ सुरू केलेली पाहायला मिळत आहे. यावेळी श्रीवर्धन नगर परिषदेचे १७ ऐवजी २० प्रभाग करण्यात आलेले आहेत. यावेळीची नगर परिषदेची निवडणूक अत्यंत चुरशीची होणार आहे.



कारण शिवसेनेत झालेली फूट व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात पडलेली फुट याचा परिणाम नगरपरिषद निवडणुकीमध्ये पाहायला मिळणार आहे. नगरपरिषदेतील प्रभागांच्या निवडणुकांबरोबरच नगराध्यक्ष पदासाठी थेट निवडणूक होणार आहे. नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीसाठी देखील अनेक जण इच्छुक आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडून राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर अध्यक्ष जितेंद्र सातनाक, माजी नगरसेवक अनंत गुरव, सौ प्रवीता माने यांच्यामध्ये कुणाची वर्णी लागते याकडे श्रीवर्धन वासियांचे लक्ष लागून राहिले आहे. मागच्या वेळी शिवसेनेकडून थेट नगराध्यक्ष पदासाठी निवडूक लढविलेले व सध्या शिवसेना (उबाठा) गटामध्ये सक्रिय असलेले ॲडव्होकेट अतुल चौगुले हे अपक्ष निवडणूक लढवतील असे राजकीय जाणकारांकडून बोलले जात आहे.

मात्र शिवसेना शिंदे गट, भारतीय जनता पक्ष, त्याचप्रमाणे काँग्रेस यांच्याकडून अद्याप नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारीसाठी कोणत्याही प्रकारची घोषणा करण्यात आलेली नाही. श्रीवर्धन शहरातील भाजपाच्या जुन्या कार्यकर्त्यांना निवडणूक प्रक्रियेपासून डावलले जात असल्याची चर्चा आहे.शरद पवार गटाचे फारसे वर्चस्व नसल्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाकडून उमेदवारी अर्ज भरण्यात येणार की नाही याबाबत उत्सुकता आहे.

## रसायनीमध्ये कंपनीत चोरी करणाऱ्यांना अटक

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पाताळगंगा औद्योगिक परिसरातील वडगाव येथील एस.बी. स्कॅफहोल्डींग कंपनीच्या आवारातून दि.१२ नोव्हें.मध्यरात्रीच्या सुमारास सेंन्टरींग कामासाठी लागणारे एकूण ७७ ॲल्युमिनियमचे पॅनल एकूण किंमत ५७०९० रुपयांचा माल चोरुन नेलेल्या चोरट्याच्या रसायनी पोलिसांनी मुसक्या आवळल्या आहेत




कंपनीचे एच आर मॅनेजर कृष्णा मिश्रा यांनी पोलिस ठाण्यात माहिती देताच संजय दत्ता म्हात्रे (वय ३२) मु.वयाळ यास ताब्यात घेतले असून आणखी दोन साथीदारांचा तपास सुरु आहे.आरोपी संजय म्हात्रे व त्यांचे दोन साथीदार यांनी एस.बी.स्कॅफहोल्डींग इंडिया प्रा.लि.या कंपनीचे गेट नं.४ ला लागून असलेल्या गॅपमधून आत प्रवेश करुन कंपनीत ताडपत्री बांधून तयार केलेल्या ओपन शेडमध्ये प्रवेश करुन सेंटरींग कामासाठी लागणारे ॲल्युमिनियमचे ७७ पॅनल ५७०९० रुपये किमतीचा माल कंपनीच्या प्रशासनाच्या परवानगीशिवाय चोरुन नेला आहे.

याप्रकरणी रसायनी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून याप्रकरणी फॉरेन्सिक टिमला कळविण्यात आले आहे.रसायनी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस सचिन चौरे अधिक तपास करीत आहेत.

## शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा सोमवारी शिक्षण आयुक्त कार्यालयावर मोर्चा

**अलिबाग : प्रतिनिधी**

राज्यातील माध्यमिक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या अनेक वर्षे प्रलंबित आहेत. शिक्षकेतरांच्या मागण्यांसाठी महामंडळाचे सरकार्यवाह शिवाजी खांडेकर यांच्या नेतृत्वाखाली सोमवारी (दि.१७) पुण्यातील ऐतिहासिक शनिवारवाड्यापासून शिक्षण आयुक्त कार्यालयावर मोर्चा धडकणार आहे.

मोर्चामध्ये राज्यातील माध्यमिक शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी होणार असल्याचे शिक्षकेत्तर महामंडळाचे सरकार्यवाह शिवाजीराव खांडेकर यांनी सांगितले. मोर्चामध्ये राज्यातील माध्यमिक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहभागी व्हावे असे आवाहन महामंडळाचे अध्यक्ष अनिल माने, सरकार्यवाह शिवाजी खांडेकर, कार्याध्यक्ष मोरेश्वर वासेकर, रायगड जिल्हा शिक्षकेतर संघटनेचे अध्यक्ष राजू रणवीर, जिल्हा उपाध्यक्ष सुरेश गावंड,राजेश वाघमारे जिल्हा सरचिटणीस लक्ष्मण ढेबे, व जिल्हा मार्गदर्शक प्रदीप काळोखे,तसेच पदाधिकारी यांनी केले आहे.

अनेक वर्षांपासून बंद असलेली माध्यमिक शिक्षकेतर कर्मचारी पदभरती तात्काळ सुरु करण्यात यावी. चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना २४ वर्षानंतर मिळणाऱ्या लाभानुसार त्यांची वेतन निश्चिती करतांना एस ४ मध्ये न करता एस ५ मध्येच करण्यात यावी.

माध्यमिक शाळातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना राज्य शासकीय कर्मचाऱ्याप्रमाणे नवीन सुधारित आश्वासित प्रगती योजनेचा १०/२०/३० वर्षानंतरचा लाभ तात्काळ लागू करण्यात यावा. माध्यमिक शाळांमध्ये शिक्षक पदासाठी पात्र असणारे शिक्षकेतर कर्मचारी यांना वेतनश्रेणी संरक्षणासह शिक्षक पदावर विनाअट पदोन्नती देण्यात यावी.

माध्यमिक शाळेतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना देण्यात आलेला २४ वर्षांचा दुसरा लाभ हा राज्य शासकीय कर्मचाऱ्याप्रमाणे पूर्वलक्षी प्रभावाने लागू करण्यात यावा. या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मुख्य मागण्या आहेत.

## सैनिक कल्याण विभागाच्या लिपिक टंकलेखक पदभरतीस मुदतवाढ

**अलिबाग :** सैनिक कल्याण विभागातील सरळ सेवेतील लिपिक टंकलेखक (गट-क) पदभरतीबाबत सैनिक कल्याण विभागाच्या www.mahasainik.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उमेदवाराकडून ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम मुदत ५ नोव्हेंबरपर्यंत देण्यात आली होती. अर्ज भरण्याकरिता दि.२६ नोव्हेंबर २०२५पर्यंत मुदतवाढ देण्यात आली असून जास्तीत जास्त उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज भरावेत, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, रायगड अलिबाग यांनी केले आहे.


**नामांकित कंपनीसाठी खालील जागा भरणे आहे**

- सिव्हील इंजिनिअर (RMC) = १
- अकाऊंट असिस्टंट = १
- सुपरवायजर = १
- ड्रायव्हर (LMV) = १

**वरिल पदासाठी किमान १ ते २ वर्षे अनुभव असलेल्यास प्राधान्य देण्यात येईल**

**संपर्कसाठी :- ८८७९५९५९७४**



**ड्रायव्हर पाहिजे**

**फॉर्च्युनर कारसाठी ड्रायव्हर पाहिजे**

१०२, सी-विंग, साक्षी पार्क-२, शिलोत्तर रायचूर, सुकापूर, नवीन पनवेल, जिल्हा रायगड (महाराष्ट्र)

माऊली एंटरप्रायजेस, जेएनपीटी, जासई-४१०२०६

**संपर्क**
**मोबाईल : ८१०८४००२१४**
**Email : ekanathpatil4141@gmail.com**


**पनवेल महानगरपालिका**
ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६
कार्यालय : २७४५८०४०/४१/४२. फॅक्स नं. : ०२२-२७४५२२३३
Email Id : panvelcorporation@gmail.com

**अग्निशमन विभाग**
**दरपत्रके मागविण्यास सूचना**

पनवेल महानगरपालिकेस सन २०२५-२६ या वित्तीय वर्षाकरीता निविदापत्रकांत नमूद केलेनुसार, पनवेल महानगरपालिका जलीय आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत अग्निशमन विभागातील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे करीता पात्र व इच्छुक संस्था/ नोंदणीकृत पुरवठाधारक व प्रशिक्षित असलेल्या संस्था यांच्या कडुन सदर कामी निविदा मागविण्यात येत आहेत. याकामी कोरे निविदा प्रपत्र व कामाची तपशिलवार माहिती www.panvelcorporation.com या दिनांक १४/११/२०२५ रोजी पासुन संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

दिनांक : १३/११/२०२५
जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२५/
प्र.क्र.५९४/६१५/२०२५

सही/-
**(कैलास गावडे)**
उपआयुक्त (मुख्यालय-I)
पनवेल महानगरपालिका

## चरई खुर्द ग्रामपंचायतीची वेबसाईट कार्यान्वित

**तळा : प्रतिनिधी**

ग्रामपंचायतीच्या शासकीय योजना, दाखले, कर वसुली, ग्रामपंचायत मार्फत राबविले जाणारे सांस्कृतिक व लोकाभिमुख कार्यक्रम, उपक्रम याची सर्वांना माहिती व्हावी या करिता तळा तालुक्यातील प्रथम ग्रामपंचायत ठरलेल्या चरई खुर्द ग्रामपंचायत वेबसाईट लोकार्पण सोहळा ११ नोव्हेंबर रोजी ग्रामपंचायत कार्यालय चरईखुर्द येथे गटविकास अधिकारी महादेव शिंदे यांच्या हस्ते पार पडला आहे.



वेबसाईट चालू करणारी चरई खुर्द ही ग्रामपंचायत तळा तालुक्यातील प्रथम ठरली आहे.या कार्यक्रमा वेळी उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे, गटविकास अधिकारी महादेव शिंदे,विस्ताराधिकारी पुष्पा नेरकर,सरपंच प्रविण आंबार्ले,ॲड.उत्तम जाधव,उपसरपंच लक्ष्मण भोईर,किशोर शिंदे, सुभाष खिडबीडे,अजय सावंत,मंगेश तांबे आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी गटविकास अधिकारी महादेव शिंदे म्हणाले की या वेबसाईट मध्ये सदर ग्रामपंचायतची माहिती ऑनलाईन पेजवर उपलब्ध आहे. स्कॅनर किंवा लिंक ओपन केल्यावर ग्रामपंचायतची संपूर्ण माहिती, झालेली कामे कार्यक्रम,ऑनलाईन अर्ज असेसमेंट, तक्रारी किंवा सूचना मेल करू शकता. तसेच अधिक माहिती उपलब्ध असेल असे त्यांनी यावेळी सूचित केले आहे.

## रायगडात १३ डिसेंबरला राष्ट्रीय लोक अदालत

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण आणि उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशावरून संपूर्ण रायगड जिल्ह्यामध्ये दि.१३ डिसेंबर २०२५ रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती वरिष्ठ दिवाणी न्यायाधीश तथा सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड अलिबाग श्रीमती तेजस्विनी निराळे यांनी दिली आहे.

या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये रायगड जिल्ह्यातील सर्व न्यायालयात प्रलंबित असलेली, दिवाणी व तडजोडपात्र फौजदारी प्रकरणे, दिवाणी व तडजोडपात्र फौजदारी अपिले, मोटार अपघात प्रकरणे, विवाह विषयक प्रलंबित प्रकरणे तसेच ग्रामपंचायत यांच्याकडील घरपट्टी, पाणीपट्टी बिलाच्या देयकाबाबतची वादपूर्व प्रकरणे, भारत दूर संचार निगम लिमिटेड, विजवितरण, राष्ट्रीयकृत बँका आणि पतसंस्था व इतर वित्तीय संस्था यांचेकडील थकबाकीबाबतची वादपूर्व प्रकरणे सदर लोक अदालतीमध्ये तडजोडीसाठी ठेवण्यात येतात. या लोक अदालतीचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

**जाहिर सावधान नोटीस**

या जाहीर नोटीसद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येतो की, मौजे : शिरढोण, ता. पनवेल, जि. रायगड येथील भुमापन क्र. ३०४ हया जमिन मिळकतीचे मालक श्री. प्रकाश पांडू उर्फे पांडूरंग चौधरी यांनी दिनांक ०१/०३/२०२५ रोजी आमचे अशिलांचे लांभात सदरहू मिळकत हस्तांतरणाचा मोबदला स्विकारून लेखी करारनामा लिहून दिला आहे, जमिन मिळकतीचे सविस्तर वर्णन खालील प्रमाणे आहे :-

मिळकतीचे वर्णन
मौजे : शिरढोण, ता. पनवेल, जि. रायगड.

| भोगवटादाराचे नाव | भुमापन क्रमांक | उपविभाग | क्षेत्र हे-आर. चौ.मी. | आकारणी रू=पेसे |
|---|---|---|---|---|
| प्रकाश पांडू चौधरी | ३०४ | - | ०-२४.८०<br>पोटखराबा ०-०२.००<br>०-२६.८० | ५.०० |

उपरोक्त वरील वर्णनाच्या जमिन मिळकतीस या नोटीशीमध्ये ''सदरहू मिळकत'' असे संबोधिलेले आहे. दिनांक ०१/०३/२०२५ रोजीच्या करारप्रमाणे सदरहू मिळकतीचे महसुल दप्तरी ७/१२ सदरी भुधारणापध्दती भोगवटावर्ग १ झालेनंतर रजिस्टर्ड खरेदीखत नोंदणीकृत करण्याचे ठरले आहे, त्याप्रमाणे आमचे अशिलांनी खरेदीखताकरीता शासनास योग्य तो मुद्रांक शुल्क व नोंदणी फी अदा केली आहे, परंतू श्री. प्रकाश पांडू चौधरी खरेदीखत नोंदणीकामी काही ना काही कारणे सांगून वेळ काढत आहे. अशी स्थिती असताना सदरहू मिळकतीचे मालक आमचे अशिलांचे अपरोक्ष सदरहू मिळकतीमध्ये त्रयस्थ इसमांच हक्क-हितसंबध निर्माण करण्याचे प्रयत्नात असल्याची माहिती आमचे अशिलांना झाली आहे. तरी सदर जाहिर नोटीशीने तमाम जनतेस सुचित करण्यात येते की, सदरहू मिळकत अगर मिळकतीचा कोणताही भाग हस्तांतरणाकरीता मिळकतीचे मालक, त्यांचे वालीवारस, हक्कहितसंबधी, प्रतिनिधी, अखत्यारी, तसेच कोणत्याही त्रयस्थ इसमांने खरेदी, विक्री, दान, बक्षीस, विकसन, समजोता, वचनपावती अगर तत्सम कोणत्याही प्रकारचा करार-मदार, बांधकाम अगर व्यवहार करू नये, तसेच रक्कम देवू/स्विकारू नये, याउप्परही सदरहू मिळकतीबाबत कोणीही कोणताही प्रकारचा व्यवहार केल्यास सदरचा व्यवहार, करार-मदार, दस्त, स्विकारलेली रक्कम आणि कृत्य हे बेकादेशिर असून, ते आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही आणि त्यामुळे आमचे अशिलांचे होणारे नुकसानीस व परिणामास सर्वस्वी संबधित व्यक्तीस/खरेदीदारास जबाबदार धरले जाईल, याची तमाम सर्व लोकांनी नोंद घ्यावी.

दिनांक: १३/११/२०२५

सही/-
ॲड. राजेश परशुराम पाटील
कार्यालयीन पत्ता : १०२, श्री बालाजी अपार्टमेंट, सारस्वत बॅंकेचे वर, सहस्त्रबुध्दे हॉस्पीटल रोड, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड. ४१०२०६.

**सहनिबंधक सहकारी संस्था (सिडको)**
यांचे कार्यालय
**शहर व औद्योगिक विकास महामंडळ, (महाराष्ट्र) मर्यादीत**
बेलापुर रेल्वेस्टेशन कॉम्प्लेक्स, टॉवर नं. ०८, पाचवा मजला, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई. ई-मेल : jointregcidco@gmail.com

जा.क्र. सनि/ससं/सिडको/ /२०२५/१४६९ दिनांक : १३/११/२०२५

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत अधिनियम १९६३ चे कलम ११(२) व नियम (२) अन्वये जाहीर नोटीस**
**अर्ज क्रमांक १५२७/२०२५**

चेअरमन/सेक्रेटरी/खजिनदार,
शक्ती ॲव्हेन्यु सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.,
भुखंड क्र. ८१, सेक्टर- ०२, उलवे, नवीमुंबई. } **अर्जदार**

**विरुध्द**

जाब देणार
२) मे. शक्ती रियल्टी
शॉप क्र.०७, अंबिका सदन, भुखंड क्र. २८ व २९ सेक्टर-४४अे, नेरुळ, नवी मुंबई- ४००७०६
३) मा. व्यवस्थापक (शहर सेवा-२)
सिडको लि, सिडको भवन, पाहिला मजला, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई.

शक्ती ॲव्हेन्यु सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., भुखंड क्र. ८१, सेक्टर-०२, उलवे, नवीमुंबई. या संस्थेचा महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत अधिनियम १९६३ चे कलम ११(२) व नियम (२) बाबतचा अर्ज दिनांक २४/१०/२०२५ रोजी या कार्यालयात प्राप्त झाला आहे.

१) अर्जदार यांनी अर्ज व त्यासोबतची आवश्यक ती कागदपत्रे जाब देणार यांना सुनावणीपुर्वी द्यावी.
२) जाब देणार तसेच इतर अशा व्यक्ती ज्यांचे हक्क बाधित होणार आहेत/ ज्यांची हरकत आहे त्यांनी त्यांच्या बचावासाठी व्यक्तीश: किंवा त्यांच्या वकीलांमार्फत अथवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधमार्फत सक्षम प्राधिकारी यांचे कार्यालयात सुनावणीपुर्वी लेखी उत्तर सादर करावे.
३) आपणाकडून प्राप्त झालेले लेखी उत्तर विचारात घेवून प्रकरणातील सुनावणी **दिनांक २७/११/२०२५ रोजी सकाळी/दुपारी ३.०० वाजता** निश्चित करण्यात येत आहे.
४) आपण व्यक्तीश: अथवा यथोचितरित्या नियुक्त केलेल्या प्रतिनिधीमार्फत उत्तर दाखल केले नाही किंवा वरील दिनांकास उपस्थित राहिला नाही तर सदर प्रकरणाची सुनावणी घेवून उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.
५) आपणास सुनावणीचे वेळी पुर्वी १० मिनिटे अगोदर प्रवेश दिला जाईल. सुनावणी वेळेनंतर प्रवेश दिला जाणार नाही व सुनावणीस आपण गैरहजर आहात असे गृहीत धरण्यात येईल.
६) सुनावणीच्या वेळी एका पक्षकाराच्यावतीने जास्तीत जास्त दोन व्यक्तींना प्रवेश दिला जाईल.
७) सदर प्रकरणी मयत पक्षकारांचे वतीने त्यांचे वारसास पक्षकार म्हणून समाविष्ठ करणेत यांवे.

सही/-
**(राजेंद्र वीर)**
सक्षम प्राधिकारी मोफा अधिनियम १९६३ तथा सहनिबंधक, सहकारी संस्था, सिडको, नवी मुंबई

**जाहीर नोटीस**
**उप विभागीय अधिकारी पनवेल उपविभाग पनवेल यांच्या न्यायालयात**
(On admission टेनन्सी अपिल क्र......../२०२५)

१) श्री. शंकर काळू पाटील
रा. घोट चाळ, पो. घोट कॅम्प, ता. पनवेल, जि. रायगड
२) श्रीमती द्रौपदी कचरू सांगडे
रा. ढोंगऱ्याचा पाडा, पो. वावंजे, ता. पनवेल, जि. रायगड
३) श्रीमती चंद्राबाई सिताराम दवणे
रा. पिसार्वे, ता. पनवेल, जि. रायगड
४) श्रीमती सविता एकनाथ पाटील
रा. सिध्दी करवले. ता. पनवेल, जि. रायगड
५) साखरुबाई मंगल पाटील मयत तर्फे वारस.
५/१) श्री. विठ्ठल मंगल पाटील,
५/२) राजाराम मंगल पाटील (मयत तर्फे वारस )
५/२/१) श्रीमती अलका राजेश पाटील, ५/२/२) श्री. आदित्य राजेश पाटील.
५/२/३) श्रीमती पूनम आकाश धुमाळ, ५/२/४) श्रीमती प्रियांका अल्पेश निघुकर,
५/३) श्री. जगदिश मंगल पाटील, ५/४) सिताबाई मंगल पाटील,
५/४/१) श्रीमती सिताबाई जगदिश साळवी, ५/४/२) श्री. साहील जगदिश साळवी,
५/४/३) श्रीमती पुजा गणेश पाटील, ६) श्री. बाळाराम रामा पाटील,
रा. घोट, चाळ, ता. पनवेल, जि. रायगड
७) श्रीमती गंगूबाई चंदर पाटील,
रा. वावंजे, ता. पनवेल, जि. रायगड
८) श्रीमती रंगूबाई नागो हजारे,
रा. नान्हेन, पो. हाजिमलंगवाडी, ता. अंबरनाथ, जि. ठाणे
९) श्रीमती फशीबाई संजय ठाकूर, १०) श्रीमती नंदाबाई रविंद्र कांदेळकर,
९ व १० रा. घोट, ता. पनवेल, जि. रायगड
११) श्रीमती ताईबाई मोतिराम हजारे
रा. उसाटणे, पो. हाजिमलंगवाडी, ता. अंबरनाथ, जि. ठाणे. ......... **वादी**

**विरुध्द**

जोमा बापू पाटील (मयत तर्फे वारस )
१) श्रीमती राजुबाई जोमा पाटील, २) श्री. बाळाराम जोमा पाटील,
३) श्री. माणिक जोमा पाटील, ४) श्री. जगदिश जोमा पाटील,
५) श्रीमती जानकुबाई बाळाराम माळी
१ ते ५ रा. घोट चाळ, ता. पनवेल, जि. रायगड
६) श्रीमती अनिता संतोष पाटील,
रा. वावंजे, ता. पनवेल, जि. रायगड
७) श्री. रामधनी महानाथ कश्यप,
रा. प्रेमजी कॉलनी, बिल्डिंग नं. ११, मानखुर्द, मुंबई
८) अरमान इरफान अली सय्यद, ९) इरफान अहमद अली सय्यद,
१०) कु. अमन फुरकान सय्यद अपाक फुरकान अहमद अली सय्यद
११) नसरीन फुरकान अली सय्यद, १२) फुरकान अहमद अली सय्यद,
१३) रझिया इरफान अली सय्यद,
सर्व रा. नागझरी, ता. पनवेल, जि. रायगड.
१४) श्री. अतुल सी दमानी, १५ ) श्री. अश्विन सी दमानी,
१६) श्री. महेश एच दमानी, १७) श्री. मिनेश एच दमानी,
१४ ते १७ रा. प्लॉट नं. ३ व ४, प्रभादेवी मुंबई. ............. **प्रतिवादी**

तमाम जनतेस तसेच सामनेवाले यांना या नोटीशीव्दारे कळविण्यांत येते की, मुंबई कुळ वहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ चे कलम ७४ नुसार मौजे - नागझरी, ता. पनवेल, जि. रायगड येथिल सर्व्हे नंबर १० / २ व १०/३ बाबत अपर तहसिलदार पनवेल यांचेकडील अपर तहसिलदार पनवेल शेतजमीन न्यायाधिकरण पनवेल यांचेकडील टेनन्सी/एसआर/१२५/२०१० चे दि. ३०/११/२०१० रोजीचे आदेशाविरुध्द अर्जदार यांनी या न्यायालयात प्रस्तुतचे अपिल दाखल केलेले आहे. सदर अपिलामध्ये वेळोवेळी सुनावणी घेण्यांत आलेल्या आहेत प्रस्तूत अपिलाच्या सुनावणीकामी सामनेवाले या न्यायालयात सुनावणीकामी हजर झालेले नाहीत. सदर अपिलाची पुढील सुनावणी ही **दिनांक २७/११/२०२५** रोजी सकाळी ११.०० वाजता निश्चित करण्यांत आली आहे.

सबब या जाहीर नोटीशीव्दारे सामनेवालेयांनी तसेच वरील जमिन मिळकतीशी संबधित असलेल्या व्यक्तीनी २१ दिवसांच्या आत उप विभागीय अधिकारी कार्यालय पनवेल, जि. रायगड येथे समक्ष येऊन आवश्यक त्या सबळ कागदोपत्री पुराव्यासह लेखी म्हणणे दाखल करावे. सदर विहीत केलेल्या मुदतीनंतर कोणचीही व कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे - नागझरी, ता. पनवेल, जि. रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे. आर. | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| १० | २ | ०.७२.८० | ७.०६ |
| १० | ३ | ०.५३.०४ | ६.२५ |

सदरची जाहीर नोटीस आज रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिली.

ठिकाण :- पनवेल.
दिनांक :- ११/११/२०२५

कोर्टाचा शिक्का

सही/-
**उप विभागीय अधिकारी पनवेल**
उपविभाग पनवेल

# नवी मुंबईत भटक्या श्वानांचा त्रास

## हेल्पलाईन क्रमांक जाहीर

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिका कार्यक्षेत्रात पशू जन्म नियंत्रण कार्यक्रम कायदयाची अंमलबजावणी सुरु असून त्यानुसार नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील भटक्या श्वानांची निर्बिजीकरण शस्त्रक्रिया व लसीकरण करण्याकरीता २००६ पासून तुर्भे येथे श्वान नियंत्रण केंद्र कार्यरत आहे. भटक्या श्वानांच्या तक्रारी नोंदविण्याकरिता २४ बाय ७ हेल्पलाईन क्रमांक ९३२००५६५८५ कार्यरत आहे.

सर्वोच्च न्यायालयाची सुमोटोनुसार २२ ऑगस्ट २०२५ रोजीच्या आदेशान्वये, महाराष्ट्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या हद्दीमध्ये ज्याप्रमाणे प्राण्यांचे संरक्षण करणे क्रमप्राप्त आहे, त्याचप्रमाणे प्राणीप्रेमींनी कायद्यान्वये जी काळजी घ्यावयाची त्याचीही अंमलबजावणी करणे क्रमप्राप्त आहे.



नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रात भटक्या श्वानांचे चावणे, मागे लागणे, लहान मुलांना भीती वाटणे व काही नागरिकांकडून सार्वजनिक ठिकाणी दररोज श्वानांना खाद्यपदार्थ टाकले जात असल्याबाबत विविध स्तरातील नागरिकांमार्फत अनेक तक्रारी या कार्यालयास प्राप्त झालेल्या आहेत. तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या दि.०७ नोव्हेंबर २०२५ रोजीच्या आदेशान्वये स्थानिक स्वराज्य संस्था यांनी निवडलेल्या ठिकाणी व ठराविक वेळेत श्वानांना खाऊ घालणे बंधनकारक आहे. त्या अनुषंगाने नागरिकांना सूचित करण्यात येत आहे की, नमुंमपामार्फत ठरवून देण्यात येणाऱ्या ठराविक ठिकाणांवर, ठराविक वेळेत श्वानांना खाऊ घालता येईल, जेणेकरुन इतर नागरिकांना याचा त्रास होणार नाही.

सर्वोच्च न्यायालयाचे व प्राणी कल्याण मंडळाच्या मार्गदर्शक सूचना व नियमांचे काटेकोरपणे पालन होईल याची दक्षता घेण्यात यावी असे नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने करण्यात सूचित करण्यात येत आहे.

दरम्यान, भटक्या कुत्र्यांची दहशत वाढत आहे. नागरिकांना होत असलेल्या दुखापतीची प्रशासनाचे दखल घेत अशा कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी होत आहे.

# पनवेल महापालिकेच्या अभय योजनेत उद्यापर्यंत ७५ टक्के सूट

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या मालमत्ता कर विभागामार्फत करदात्यांना दिलासा देण्यासाठी 'अभय योजना' राबविण्यात येत आहे. आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या सूचनेनुसार १५ नोव्हेंबरपर्यंत शास्तीवरती ७५ टक्के सूट देण्यात आली आहे. यानंतर कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही. या अभय योजनेचा मालमत्ताधारकांनी लाभ घ्यावा असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आला आहे. अभय योजनेंतर्गत आत्तापर्यंत सवलतीसह ५९४.१० कोटींचा कर पालिकेच्या तिजोरीत जमा झाला आहे.

याआधी महापालिकेने करदात्यांना शास्तीमध्ये तब्बल ९० टक्के सवलत होती. त्यानंतर आता १५ नोव्हेंबर २०२५ पर्यंत मालमत्ता कर भरणाऱ्यांना ७५ टक्के शास्ती माफी देण्यात आली आहे. आता या सवलतीचे केवळ दोन दिवस राहिले आहेत. नागरिकांनी या सवलतीचा लाभ घ्यावा असे आवाहन उपायुक्त स्वरूप खारगे यांनी केले आहे.

महापालिकेकडून नागरिकांना विविध सवलतींचा लाभ घेण्यासाठी डिजिटल व्यवहाराला प्रोत्साहन देण्यात आले आहे. करदात्यांनी ऑनलाईन पद्धतीने कर भरणे यामुळे थेट २% सवलत मिळू शकते. तसेच ऊर्जा बचत करणारे सौर पॅनल, शेड नेट, वॉटर हार्वेस्टिंग अशा उपाययोजना केल्यास करामध्ये २% सवलत दिली जाणार आहे. याशिवाय घनकचऱ्याची शास्त्रोस्त पध्दतीने विल्हेवाट करणाऱ्या सोसायट्यांना नियमानुसार २ टक्के करात सवलती मिळणार आहे.

कर भरण्याची प्रक्रिया सुलभ करण्यासाठी महापालिकेचे panvelmc.org हे संकेतस्थळ तसेच PMC TAX APP आणि Panvel Connect App उपलब्ध करून देण्यात आले आहे. यामुळे करदात्यांना घरबसल्या ऑनलाईन कर भरण्याची सुविधा मिळत आहे.

**कर-मित्र' चॅटबॉटची सेवासुरू**

नागरिकांना अधिक सोयीस्कर, वेगवान आणि पारदर्शक सेवा देण्यासाठी पनवेल महानगरपालिकेने 'कर-मित्र' चॅटबॉट सेवा सुरू केली आहे. हा अत्याधुनिक चॅटबॉट मालमत्ता करदात्यांना घरबसल्या त्वरित माहिती, मार्गदर्शन आणि ऑनलाइन मदत पुरवितो आहे.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात सेमिनार

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात गुरुवारी (दि.१३) करिअर गाईडन्स, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट समितीच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी परदेशात उच्च शिक्षणासाठी असणाऱ्या वेगवेगळ्या संधी या विषयावर सेमिनारचे आयोजन करण्यात आले.

या सेमिनारचे उद्दिष्ट विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय शिक्षणाच्या संधी, प्रवेश प्रक्रिया तसेच शिष्यवृत्तीच्या पर्यायांविषयी माहिती देणे हे



होते. या सत्रासाठी अपग्रेड या नामांकित संस्थेच्या स्वाती रंजन (इनचार्ज, पॅन इंडिया) आणि श्री. डॅनियल एनामदार (असोसिएट मॅनेजर, अपग्रेड - मुंबई विभाग) हे मान्यवर वक्ते उपस्थित होते तसेच त्यांनी विद्यार्थ्यांना परदेशातील शिक्षणाच्या विविध संधी, आवश्यक पात्रता, अर्ज करण्याची प्रक्रिया आणि शिष्यवृत्तींबाबत सविस्तर माहिती दिली. या मार्गदर्शन सत्रास ८५ विद्यार्थी उपस्थित होते व विद्यार्थ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी या सेमिनारचे आयोजन केल्याबद्दल करिअर गायडन्स ट्रेनिंग व प्लेसमेंट समितीचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या. या सेमिनारचे आयोजन प्रा. अर्पिता नायक यांनी केले तसेच करिअर गायडन्स, ट्रेनिंग व प्लेसमेंट समितीतील इतर सर्व सदस्य विद्यार्थी व शिक्षक इतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.



**पनवेल : तालुक्यातील मोरावे येथील उत्तम कोळी यांची कन्या तन्वी हिच्या विवाहनिमित्त महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट देत शुभेच्छा दिल्या. या वेळी कोळी कुटुंबियांनी परेश ठाकूर आणि उपस्थित सर्वांचे स्वागत केले.**

# पनवेलच्या बाजारात पालेभाज्यांची आवक वाढली

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

हिवाळा सुरू झाल्यामुळे ठाण्यात पालेभाज्यांची आवक दिवसेंदिवस वाढत आहे. विशेष करून चवळी, माठ, मेथी, शेपू, पालक यासह कोथिंबीरीची अधिक आवक वाढल्याचे दिसून येत आहे. आवक वाढली असली तरी पालेभाज्यांचे दर वाढले आहेत. पनवेलमधील एपीएमसी मार्केट, जुने भाजी मार्केट व रोज बाजार येथे परिसरात पालेभाज्यांची आवक वाढल्याचे दिसून येत आहे. पालेभाज्या खाण्याचे आरोग्यासाठी फायदे होत असल्याने नागरिक मोठ्या प्रमाणावर भाज्या खरेदी करीत आहेत.

याचबरोबर फळभाज्यांमधील टोमॅटो, कोबी आणि फ्लॉवरचीही आवक वाढली आहे.

# पर्यावरणदूतांची निवड करण्यासाठी पनवेल परिसरातील शाळांमध्ये उपक्रम

## माझी वसुंधरा अभियान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या वतीने माझी वसुंधरा अभियान ६.० अंतर्गत पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत.

विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबद्दल जागरूकता निर्माण करणे आणि शाश्वत विकासासाठी विद्यार्थ्यांना व युवकांना प्रेरित करण्याच्या उद्देशाने पर्यावरणदूतांची निवड करण्यासाठी महापालिकेच्या शाळा क्रमांक १ व उर्दु शाळा क्रमांक १० तसेच रामशेठ ठाकूर प्राथमिक शाळा ओवे पेठ तसेच जिल्हा परिषद ओवे पेठ या शाळांमध्ये नुकताच विशेष जनजागृती उपक्रम राबविण्यात आला.

या अभियानांतर्गत १० नोव्हेंबर रोजी पनवेल महानगरपालिका शाळा क्रमांक १मध्ये व उर्दू शाळा क्रमांक १० तसेच



११ नोव्हेंबर रोजी रामशेठ ठाकूर प्राथमिक शाळा ओवेपेठ तसेच जिल्हा परिषद शाळा ओवेपेठमध्ये परिसंवादाचे आयोजन करण्यात आले.

या परिसंवादामध्ये पर्यावरण संवर्धन, हवामान बदल साक्षरता आणि स्वच्छतेचे महत्त्व याबद्दल विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. या उपक्रमाद्वारे प्रत्येक शाळेतून उत्साही व जबाबदार विद्यार्थ्यांची पर्यावरण दूत म्हणून निवड करण्यात आली. हे पर्यावरण दूत पनवेल महानगरपालिकेसोबत विविध पर्यावरणीय उपक्रम, स्वच्छता मोहिमा आणि जनजागृती कार्यक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेणार आहेत.

पर्यावरण विभागाच्या वतीने उपायुक्त स्वरूप खारगे यांनी महापालिका क्षेत्रातील सर्व शाळा आणि महाविद्यालयांना या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन केले असून या माध्यमातून तरुण पिढीमध्ये पर्यावरणपूरक विचारसरणी रुजविण्याचा प्रयत्न केला जात आहे.

# गव्हाण विद्यालयात स्नेहभोजन

## अधिकारी, गावकरी अन् शिक्षकांचाही सहभाग

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शालेय विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या पोषण आहारांतर्गत रोजच्या आहारा व्यतिरिक्त इतर चविष्ट, पौष्टिक पदार्थांसह मिठाई असा स्वादिष्ट मिष्टान्नाचा बेत, सोबत स्थानिक शाळा समितीच्या चेअरमन यांच्यासह सर्व सदस्य, विभागीय अधिकारी, कार्यालयातील सेवक आणि शिक्षक यांचा सहवास असा स्नेहभोजन सोहळा गुरुवारी (दि.१३) गव्हाण विद्यालयात रंगला.

स्नेहभोजन या संकल्पनेतून रयत शिक्षण संस्थेच्या येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये शालेय पोषण आहारांतर्गत ग्रामस्थ व अधिकाऱ्यांसह विद्यार्थ्यांनी



स्नेहभोजनाचा आस्वाद घेतला.

या वेळी स्थानिक शाळा समितीचे चेअरमन तथा रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत यांना स्नेहभोजनाच्या वेळी विद्यार्थ्यांची पद्धतशीरपणे बैठक व्यवस्था आणि एकत्र बसून विद्यार्थ्यांनी भोजनाचा मनसोक्त आस्वाद घेतानाची भावमुद्रामय स्नेहदृश्य भावले.

या वेळी संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य डी.बी. पाटील, स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंता ठाकूर व विश्वनाथ कोळी, 'रयत'चे विभागीय अधिकारी मोहनराव कोंगेरे, लाईफ वर्कर महेश पाटील, महात्मा फुले महाविद्यालयाच्या प्रा.सुनिता काटकर, प्राचार्या व संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या जोत्स्ना ठाकूर, लाईफ मेंबर रवींद्र भोईर, लाईफ वर्कर देवेंद्र म्हात्रे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, विभागीय कार्यालयाचे संतोष गुजर, वैभव गावंड आदी उपस्थित होते.

विद्यालयाच्या शालेय पोषण आहार विभागाचे प्रमुख विशांत ठाकूर यांचे अत्यंत शिस्तपूर्ण व नेटके नियोजन यांमुळे स्नेहभोजनाचा सोहळा झाला.

# पक्षी सप्ताहानिमित्ताने वरद गावंडने रेखाटली पक्ष्यांची आकर्षक चित्रे



**उरण : प्रतिनिधी, बातमीदार**

पक्षी सप्ताह आणि अरण्य ऋषी मारुती चितमपल्ली व बर्ड मॅन ऑफ इंडिया डॉ.सालिम अली यांच्या जयंती निमित्ताने पिरकोन-उरण येथील अठरा वर्षीय वरद खुशाली विलास गावंड यांनी विविध पक्षांची आणि दोघांची आकर्षक चित्र रेखाटून अनोखी मानवंदना दिली आहे.

उरण तालुक्यातील पिरकोन येथील विलास गावंड यांचा एकुलता मुलगा वरद गावंड. त्याचे पहिली ते दहावीपर्यंत शिक्षण जेएनपीटीच्या शाळेत झाले आहे. वडिल गागोदे येथील विनोबा भावे यांच्या आश्रमात सर्वोदय सेवा कार्यकर्ता म्हणून काम करीत आहेत. तर आई खुशाली खारघर येथील एका इस्पितळात नर्स म्हणून काम करीत आहे. वरदला लहानपणापासून चित्रकलेची आवड होती. त्याच्या चित्रकलेच्या आवडीला आईवडीलांनीही प्रोत्साहित केले.

आईवडिलांच्या प्रोत्साहनानंतर चित्रकलेचा छंद जडलेल्या वरदनेही चित्रकलेत स्वताला झोकून दिले. कोरोना महामारीच्या लॉकडाऊनमुळे शाळा बंद होत्या. त्यावेळी वरद गावंड आठवीत शिकत होता. त्यावेळी विद्यार्थ्यांना घरीच राहून ऑनलाईन शिक्षण सुरू झाले होते, परंतु त्यावेळी मिळालेल्या वेळेचा सदुपयोग करून १३ वर्षीय वरदने देशाला स्वातंत्र्यप्राप्तीसाठी आपल्या प्राणांचे बलिदान देणाऱ्या ५० महापुरुष व स्वातंत्र्य सैनिकांची चित्रे रेखाटली होती.वरदने ही चित्रे रेखाटून विसर पडलेल्या सर्वांनाच स्वातंत्र्य सैनिकांच्या आठवणींना उजाळा करून दिला होता.

त्यानंतर वरदने १८ वर्षांच्या काळात निसर्गचित्र, व्यक्तीचित्र, जलरंग, क्रालिक,सोलपेस्टल, ऑईल कलर, पोर्ट्रेट, कॅनव्हास आदी सर्व माध्यमांचा वापर करून आजवर अनेक चित्रं रेखाटली आहेत. नुकत्याच ऑक्टोबरमध्ये आयोजित करण्यात आलेल्या तीन दिवसांच्या पुण्यातील बालगंधर्व आर्ट गॅलरीत आयोजित करण्यात आलेल्या चित्रकला प्रदर्शनात वरदच्या चार चित्रांचा समावेश करण्यात आला होता.

नुकतीच पक्षी सप्ताहाला सुरुवात झाली आहे. या पक्षी सप्ताहाच्या निमित्ताने अरण्य ऋषी मारुती चितमपल्ली व बर्ड मॅन ऑफ इंडिया डॉ.सालिम अली यांचीही जयंती साजरी केली जात आहे. या पक्षी सप्ताह आणि अरण्य ऋषी मारुती चितमपल्ली व बर्ड मॅन ऑफ इंडिया डॉ.सालिम अली यांच्या जयंतीनिमित्ताने अठरा वर्षीय वरदने चिमणा, सुर्य पक्षी, दयाल पक्षी, खंड्या, महाधनेश, वटवट्या, बुलबुल, हलद्या, पांढरा करकोचा, लाल मुनिया आदी विविध पक्षांची आकर्षक, सुंदर चित्रे रेखाटली आहेत. तर मारुती चितमपल्ली व डॉ.सालिम अली यांचीही हुबेहूब चित्र रेखाटून एकप्रकारे अनोखी मानवंदनाच दिली आहे.



**पनवेल : उरण तालुक्यातील वशेणी येथील संदीप नारायण पाटील यांचा मुलगा तन्मय याच्या विवाहानिमित्त करंजाडेतील आयोजित सोहळ्याला महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट देत शुभेच्छा दिल्या. या वेळी पाटील कुटुंबियांकडून त्यांचे स्वागत करण्यात आले. सोबत करंजाडेचे सरपंच मंगेश शेलार.**

# श्री ब्रम्हचैतन्य मासिक संगीत सभा उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री ब्रह्मचैतन्य मासिक संगीत सभेचे ४८ वे पुष्प झाले. येथील गोंदवलेकर महाराज नामस्मरण केंद्रात झालेल्या कार्यक्रमात शास्त्रीय गायक नरेंद्र चक्रवर्ती यांनी संगीत सेवा सादर केली.

त्यांनी संगीत सभेची सुरुवात राग यमन ने केली. त्यानंतर पुरिया कल्याण रागातील बंदिश सादर केली. यानंतर भुप रागातील बंदिश आणि त्याला जोडून 'अबीर गुलाल' हा प्रसिद्ध अभंग सादर केला. नंतर 'यह जीवन अनमोल है' हे गीत



सादर करून राधाधर मधु मिलिंद हे नाट्यपद व सुंदर ते ध्यान हा अभंग सादर केला. 'बाट चलत मोरी चुनरी रंग डाली' या भैरवीने त्यानी संगीत सभेची सांगता केली.

युवा तबला वादक जयेश सोहनी यांनी तबला, आशिष नागपूरकर यांनी संवादिनी, शार्दूल डोंगरे यांनी ताल वाद्य साथ केली. समीर सोमण यांनी कार्यक्रमाचे निवेदन केले. संगीत सभेचे आयोजक आणि मठातील कार्यकर्त्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मोलाचे योगदान दिले.

# खोपोली पालिका निवडणूक तयारीचा जिल्हा प्रशासनाने घेतला आढावा

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ पारदर्शक, सुरक्षित आणि सुरळीत पार पाडण्यासाठी रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी खोपोली नगर परिषदेची भेट देऊन निवडणुकीच्या तयारीचा सविस्तर आढावा घेतला.



या भेटीदरम्यान जिल्हाधिकारी यांनी सर्वप्रथम स्ट्राँग रूम तसेच मतमोजणी केंद्राची पाहणी केली. मतदानानंतर इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे (एतच्) ठेवण्यात येणाऱ्या स्ट्राँग रूममध्ये सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक असणाऱ्या सर्व सुविधा – जसे की २४ तास सीसीटीव्ही नियंत्रण, पोलीस सुरक्षा, अग्निशमन यंत्रणा, पर्यायी वीजपुरवठा व्यवस्था, तसेच कडक प्रवेश नियंत्रण यांची तपशीलवार पाहणी करण्यात आली.

यानंतर जिल्हाधिकारी यांनी मतमोजणी केंद्र पाहून मतमोजणीदरम्यान होणाऱ्या प्रक्रिया, टेबल नियोजन, कर्मचारी नियोजन, सुरक्षा उपाययोजना, तसेच माध्यम प्रतिनिधींसाठीच्या सुविधा यांचा आढावा घेतला. त्यांनी निवडणूक प्रक्रिया पारदर्शक आणि शिस्तबद्ध रितीने पार पाडण्यासाठी आवश्यक त्या सूचना दिल्या.

जिल्हाधिकारी जावळे यांनी सांगितले की, निवडणूक ही लोकशाहीची मूलभूत प्रक्रिया असून नागरिकांचा विश्वास अबाधित राखणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. प्रत्येक मतदाराला सुरक्षित आणि निर्भय वातावरणात मतदान करता यावे, यासाठी सर्व यंत्रणा सज्ज राहाव्यात, असे त्यांनी निर्देश दिले.

या पाहणीदरम्यान रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक, आंचल दलाल उपस्थित होत्या. त्यांनी निवडणुकीदरम्यान सुरक्षा यंत्रणेच्या तयारीचा आढावा घेतला आणि पोलिस विभागाच्या तैनातीसंदर्भात मार्गदर्शन केले.

या वेळी निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (कर्जत) प्रकाश संकपाळ, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार (खालापूर) अभय चव्हाण, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा मुख्याधिकारी (खोपोली नगर परिषद) पंकज पाटील तसेच वरिष्ठ पोलीस निरीक्षक उपस्थित होते.

# आरोग्य जनजागृती उपक्रमांना गती देणार –डॉ. विजय कंदेवाड

**रायगड : रामप्रहर वृत्त**



विविध आरोग्य कार्यक्रम आणि योजनांचा प्रभावी प्रसार करून त्या अधिकाअधिक नागरिकांपर्यंत पोहोचाव्यात यासाठी आरोग्य सेवा संचालक डॉ.विजय कंदेवाड यांच्या अध्यक्षतेखाली राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग पुणे येथे आढावा बैठक घेण्यात आली.

राज्यभरातील सर्व जिल्ह्यातील जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी (DEMO) उपस्थित होते. रायगड जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी आर.डी. संकपाळ यांनी यात सहभाग घेतला. राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभागाचे उपसंचालक डॉ. कैलास बाविस्कर, डॉ. भगवान पवार उपसंचालक आरोग्य सेवा पुणे तसेच सहाय्यक संचालक डॉ. संजय कुमार जठार बैठकीला उपस्थित होते.

आरोग्य जनजागृती उपक्रम जनसंपर्क मोहिमा तसेच माध्यमांशी प्रभावी संवाद यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. संचालक डॉ. विजय कंदेवाड यांनी आरोग्य विभागाच्या विविध योजना आणि उपक्रम जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी नावीन्यपूर्ण माध्यम धोरण आखन्याची सूचना केली. आरोग्य विषयक माहिती जनसामान्यांना सुलभभाषेत आणि आकर्षक पद्धतीने दिल्यास त्यांच्या आरोग्यविषयक जागरूकतेत मोठी भर पडेल प्रसारमाध्यमांशी सकारात्मक आणि सातत्यपूर्ण संपर्क राखणे तसेच आरोग्याशी संबंधित नकारात्मक किंवा गैरसमज निर्माण करणाऱ्या बातम्यांना योग्य प्रतिउत्तर देऊन तथ्य मांडणे याबाबतही त्यांनी मार्गदर्शन केले. सर्व जिल्हा माध्यम अधिकाऱ्यांना समाज माध्यमांचा प्रभावी वापर करण्याच्या सूचना दिल्या. विभागाच्या अधिकृत समाज माध्यम खात्यावरील फॉलोवर्स वाढवण्यासाठी समन्वयित प्रयत्न करावेत, अशी सूचनाही त्यांनी केली.

आरोग्य जनजागृती हा केवळ विभागाचा कार्यक्रम नसून तो एक सामाजिक जबाबदारीचा भाग आहे. प्रत्येक अधिकाऱ्याने त्यासाठी सक्रिय भूमिका बजावली पाहिजे अशी अपेक्षा डॉ. बाविस्कर यांनी व्यक्त केली. बैठकीत जिल्हास्तरावर राबविल्या जाणाऱ्या आरोग्य विषयक जनजागृती कार्यक्रमांचे अनुभव अडचणी व यशोगाथा याची देवाणघेवाण करण्यात आली, जनतेत आरोग्यविषयक जनजागृती वाढवण्यासाठी सर्व स्तरावर माहिती प्रसार मोहिमा अधिक सशक्त करण्यावर भर देण्यात आला.

# माथेरान भाजप-शिवसेनेकडून चंद्रकांत चौधरी थेट नगराध्यक्षपदाचे उमेदवार

**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरान नगरपालिका निवडणुकीच्या पाश्वभूमीवर शिवसेना आणि भाजप यांच्या युतीकडून नगराध्यक्ष पदाचे उमेदवार चंद्रकांत चौधरी यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.



माथेरान नगरपालिका निवडणूक जाहीर होऊन काही दिवस झाले असले तरी भाजपा आणि शिंदे शिवसेना युती कडून नगराध्यापदाचा उमेदवार जाहीर करण्यात आला नव्हता. दोन प्रबळ दावेदार एकमेकांसमोर येथे उभे ठाकले होते. शहर प्रमुख चंद्रकांत चौधरी आणि माजी नगराध्यक्ष मनोज खेडकर या दोघांनी या पदावर दावा ठोकला होता. उमेदवारी अर्ज भरण्यास सुरुवात झाली तरी हा नगराध्यक्ष पदाचा तिढा काही केल्या या ठिकाणी सुटत नव्हता.

अखेर स्थानिक आमदार महेंद्र थोरवे यांनी याकडे लक्ष केंद्रित करून हा तिढा मोठ्या शिताफीने सोडविण्यात यश मिळवले आहे.

नगराध्यक्ष पदाच्या सर्वसाधारण जागेसाठी शहर प्रमुख चंद्रकांत चौधरी यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. आता माथेरान भाजप आणि शिवसेना युतीचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार चंद्रकांत चौधरी यांना तिकीट मिळाले असून शिवराष्ट्र पॅनलचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार अजय सावंत आणि युतीचे उमेदवार चंद्रकांत चौधरी यांच्यामध्ये थेट लढत होणार आहे.

# माजगाव येथे आरोग्य शिबिर



**चौक, मोहोपाडा : प्रतिनिधी**

लायन किशोर पाटील यांनी लायन्स क्लब खालापूर व ग्रामपंचायत माजगाव यांच्या संयुक्त विद्यमाने महाआरोग्य शिबिर विठ्ठल रुक्मिणी मंदिर माजगाव येथे आयोजित केल होत. त्यास परिसरातील रुग्णांनी चांगला प्रतिसाद दिला, ग्रामीण भागात अशा आरोग्य शिबिरांची गरज असल्याचे अनेक रुग्णांनी सांगितले.

शिबिरामध्ये मधूमेहच्या वेगवेगळ्या चाचण्या, रक्तचाप तपासणी, इसीजी, डोळे तपासणी करून मोफत आय ड्रॉप देण्यात येऊन अल्प दरात चष्मे वाटप करण्यात आले. या वेळी ३९ रक्तदाते यांनी रक्तदान केले. सुमारे २२९ रुग्णांनी या शिबिराचा लाभ घेतला. मोफत औषधे देण्यात आली. ग्रामीण भागात अशी आरोग्य शिबिरे घेण्यात यावीत, येथील परिसर दुर्गम व आदिवासी भागात आहे, रुग्णांना दवाखान्यात जाण्यासाठी ८० ते १०० खर्च येतो, मोलमजुरी करणाऱ्या रुग्णांना हे परवडणारे नसल्याने आपण हा उपक्रम घेतला असल्याचे लायन किशोर पाटील यांनी सांगितले.

शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले तर आलेल्या रुग्णांना मोफत जेवण देण्यात आले. मेडीकव्हर हॉस्पिटल खारघर यांच्या सौजन्याने रक्तदान व हेल्थ चेकअप करण्यात आले तर सनशाईन सुपर स्पेशालिस्ट हॉस्पिटल पनवेल यांनी डोळे तपासणी करून रुग्णांना दिलासा दिला. या वेळी लहू भोईर, जितेंद्र सकपाळ, हरिभाऊ जाधव यांच्यासह सरपंच आणि ग्राम पंचायत सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जयवंत पाटील यांनी केले.

# चौक येथे शिवस्मारकाचे भूमिपूजन



**चौक : प्रतिनिधी**

चौक या ऐतिहासिक गावात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकाचे भूमिपूजन गुरुवारी (दि.१३) ऐतिहासिक दगडी शाळेच्या आवारात झाले. या ऐतिहासिक गावात अनेक वर्षांची जनतेची मागणी पूर्णत्वास जात असल्याने शिवभक्त आणि शिवप्रेमी यांच्यात चैतन्य निर्माण झाले आहे.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या साक्षीने उंबरखिंडची लढाई ही २ फेब्रुवारी १६६१ रोजी छत्रपती शिवाजी महाराज आणि मुघल जनरल कारतलब खान यांच्यात झाली होती. या लढाईत शिवाजी महाराजांनी सुमारे १००० मावळ्यांच्या साथीने २०,००० मुघल सैन्याचा पराभव केला, जे गनिमी काव्याचे एक उत्तम उदाहरण आहे. या लढाईचे नेतृत्व सरनोबत नेताजी पालकर यांनी केले होते. सर नोबत नेताजी पालकर यांचे चौक हे जन्म गाव आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या युद्धनीतीचे हे एक अद्वितीय आणि महत्त्वपूर्ण उदाहरण मानले जाते, ज्यामुळे मराठा इतिहासात या लढाईला खास स्थान आहे. आणि अशा महान योद्ध्याचे स्मारक चौक येथे नसावे याची खंत चौकवाशी यांना अनेक वर्ष होती.

भारतीय जनता पक्षाचे उत्तर रायगड उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे आणि रायगड जिल्हा परिषद माजी सदस्य मोतीराम ठोंबरे यांनी स्वखर्चाने हे स्मारक उभारण्याचा संकल्प केला आहे. त्याचे भूमिपूजन चौक सरपंच रितू ठोंबरे यांच्या हस्ते करण्यात आले. शिवस्मारक हे हिंदवी साम्राज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सन्मानार्थ चौकमध्ये बाजारपेठ येथे उभारले जाणारे एक भव्य स्मारक आहे. हे स्मारक चौक च्या गौरवशाली इतिहासाचे प्रतीक होईल.

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याची आठवण ठेवणे आणि त्यांना आदरांजली वाहणे हा या स्मारकाचा मुख्य उद्देश आहे,असे रायगड जिल्हा परिषद सदस्य मोतीराम ठोंबरे यांनी सांगितले. हे स्मारक महाराष्ट्राच्या तेजस्वी इतिहासाचे प्रतीक म्हणून या परिसराला प्रेरणा देईल, तरुणांमध्ये ऊर्जेची भावना निर्माण करेल असे भारतीय जनता पक्षाचे उत्तर रायगड उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे यांनी प्रतिनिधी यांच्याशी बोलताना सांगितले.

या भूमिपूजन सोहळ्यास लोकनेते जगदीश हातमोडे, चौक उपसरपंच पूजा हातमोडे, जेष्ठ नेते विनोद भोईर, गिरीश जोशी, सुभाष पवार, नयना झिंगे, वृषाली पोळेकर, राजन गावडे, प्रदीप गोंधळी, गुड्या देशमुख, सागर ओसवाल, ग्राम पंचायत अधिकारी गणेश मोरे, सचिन साखरे, अजिंक्य देशमुख, शरद पिंगळे, वसंत देशमुख, चौकचे व्यापारी, ज्येष्ठ नागरिक, ग्रामस्थ यांच्यासह शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# साळाव येथे अग्निसुरक्षा मॉक ड्रील

**मुरूड : प्रतिनिधी**

जिंदल विद्या मंदिर, साळाव येथे विद्यार्थ्यांमध्ये आणि शिक्षकांमध्ये अग्निसुरक्षा तसेच आपत्कालीन परिस्थितीतील सजगता निर्माण करण्याच्या उद्देशाने एक प्रभावी 'मॉक फायर सेफ्टी आणि इव्हॅक्युएशन ड्रील आयोजित करण्यात आली.



ही ड्रील जे. एस. डब्ल्यू. ग्रीन प्लांट, साळाव फायर स्क्वॉडच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या पथकाचे नेतृत्व योगेश वासनिक यांनी केले. कार्यक्रमाचे मुख्य उद्दिष्ट होते की, आग लागल्यास सर्वांनी योग्य, शांत आणि शिस्तबद्ध पद्धतीने सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करणे.

या सरावादरम्यान फायर स्क्वॉडने विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना फायर एक्स्टिंग्विशरचा योग्य वापर, तसेच संकटाच्या क्षणी उपस्थित बुद्धी, संयम आणि तत्परतेचे महत्त्व याबाबत प्रात्यक्षिकांद्वारे मार्गदर्शन केले. सर्व शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला व काही मिनिटांत संपूर्ण शाळा शिस्तबद्धरीत्या रिकामी करण्यात आली.

या उपक्रमाचा पुढाकार प्राचार्य मुकेश ठाकूर यांनी घेतला. त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये सुरक्षिततेची जाणीव आणि जबाबदारीची भावना रुजविण्यासाठी हा उपक्रम राबविला तसेच जे. एस. डब्ल्यू. साळावचे प्लांट हेड आणि शाळा व्यवस्थापन समितीचे चेअरमन पंकज मलिक यांचे विशेष कौतुक करण्यात आले. त्यांच्या सततच्या प्रोत्साहनामुळे आणि सहकार्यामुळे जिंदल विद्या मंदिरमध्ये सुरक्षा व शिस्त या मूल्यांचा दृढ पाया निर्माण झाला आहे.

कार्यक्रमाच्या शेवटी उपप्राचार्य मंगेश बामनोटे यांनी जे. एस. डब्ल्यू. फायर स्क्वॉडचे त्यांच्या कुशल मार्गदर्शन आणि मौल्यवान प्रात्यक्षिकांसाठी मनःपूर्वक आभार मानले. या उपक्रमामुळे विद्यार्थी अधिक जागरूक, आत्मविश्वासी आणि आपत्कालीन प्रसंगी सज्ञपणे प्रतिसाद देण्यास सक्षम झाले आहेत.

# हेटवणे वाडी येथील चिमुकली बेपत्ता

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील हेटवणे आदिवासी वाडी येथील चार वर्षीय चिमुकली बेपत्ता झाल्याची हृदयद्रावक घटना घडली आहे.

याबाबत माहिती अशी किशोरी किरण महालकर ही चिमुकली सकाळी ८.३०च्या सुमारास तिची आजी व चुलत बहिणींबरोबर प्रातः विधीसाठी जवळील डोंगर भागाकडे गेली होती या वेळी काही वेळाने किशोरी हि कुठेच दिसत नसल्याचे तिच्या आजीच्या लक्षात आले असता तिने आरडाओरडा केला. या वेळी वाडीवरील ग्रामस्थांनी किशोरीचा शोध घेतला असता ती कुठेच आढळून आली नाही. दरम्यान, दुपारी मुलीच्या आईने पेण पोलीस ठाण्यात मुलगी बेपत्ता झाल्याची फिर्याद नोंदविली. पेण पोलीस घटनास्थळी दाखल झाले. त्याच्याबरोबर विविध सामाजिक संघटना, पोलीस कर्मचारी यांनी रात्रीपर्यंत शोधकार्य सुरू ठेवल. दरम्यान, गावकऱ्यांना मुलीची चप्पल आणि कपडे नाल्याजवळ सापडले, मात्र मुलगी मात्र कुठेच सापडली नाही.

पोलीस निरीक्षक आंचल दलाल यांनी घटनेची गांभीर्य लक्षात घेता पेण पोलीस निरीक्षक संदीप बागुल यांच्या मार्गदर्शनाखाली सीआरपी, क्यूआरटी, शवना श्वानपथक आणि खोपोली येथील बचाव पथकाला घटनास्थळी रवाना केले. जवजवळ शोधमोहिमेला २४ तास उलटूनही चिमुकलीचा थांगपत्ता लागलेला नाही. यामुळे परिसरात संभ्रम आणि तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. याप्रकरणी पेण पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक विक्रम नवरखेडे हे करीत आहेत.

# चौकच्या एकवीरा देवी ग्रुपतर्फे कार्ला पायी दिंडी

**चौक : प्रतिनिधी**

एकवीरा देवी ग्रुप चौक परिसर यांच्या वतीने चौक ते आई एकवीरा देवी कार्ला अशी पायी दिंडी काढण्यात आली होती.

सामाजिक कार्यकर्ते आणि आई एकवीरा देवी भक्त नंदू हातमोडे यांनी याही वर्षी चौक ते आई एकवीरा देवी कार्ला अशी पायी दिंडी काढली होती. परिसरातील भक्तांनी चौक ते कार्ला अशी पायी चालत वारी केली. दिंडीचे जागोजागी स्वागत करून आई एकवीरा देवी ची पूजा करण्यात आली. विनोद भोईर, सागर ओसवाल, सुभाष पवार यांच्यासह अनेक भक्तांनी पायी चालत दिंडीत सहभाग घेतला.

# बोर्लीत नरेंद्राचार्यांच्या पादुकांचा दर्शन सोहळा

**रेवदंडा : प्रतिनिधी**

अनंत श्रीविभुषित रामानंदाचार्य नरेंद्राचार्य व पिठाचे उत्तराधिकारी कानिफनाथ महाराज यांच्या कृपाशिर्वादाने रत्नागिरी–नाणिज दक्षिणपीठ नाणीजधामच्या वतीने मुरुड तालुक्यातील बोर्ली येथे सिद्ध पादुका दर्शन सोहळा झाला.



कार्यक्रमस्थळी सर्वप्रथम श्रींच्या पादुकांचे आगमन झाल्यानंतर गुरुपूजनासह सामाजिक उपक्रमांतर्गत रामानंद संप्रदायातर्फ अलिबाग –मुरूड मतदार संघाचे आमदार महेंद्र दळवी व महेश मोहिते यांच्या हस्ते गरजू विद्यार्थ्यांना ६० सायकलींचे वाटप करण्यात आले. त्यानंतर गुरुपूजन व श्रींची आरती, तदनंतर ज.न.म. प्रवचनकार शोभा बेलदार यांचे सुश्राव्य सुमधूर बहारदार प्रवचन झाले.


या वेळी अॅड. महेश मोहिते, पीठ प्रसिद्धी प्रमुख राजन बोंडेकर, पीठसहाय्यक गणेश मोरे, पीठ महिला निरीक्षक राधिका पाटील, पीठ लेफ्टनंट राजेंद्र खांबल,पीठ युवा निरीक्षक सुनील वीर, पीठ जनगणना प्रमुख तुषार कदम, पीठ धर्मक्षेत्र प्रमुख कुमार पवार, प्रोटोकाल अधिकारी विष्णू कदम, दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष संतोष सूर्यवंशी,उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष दिनेश पाटील ज़िल्हा कर्नल चंद्रकांत लोणशीकर, उत्तर रायगड कर्नल सुजित पाटील, महिला ज़िल्हाध्यक्ष अंजली जगताप, मुरूड तालुका अध्यक्ष अंकुश वाडकर, सचिव संतोष चोरघे, संतोष घाग, बाबा डायला ज़िल्हा युवाध्यक्ष भरत थिटे, सर्व जिल्हा व तालुका कमिटीसह हजारोंच्या संख्येने भक्तगण उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी दक्षिण रायगड सेवा समिती, उत्तर रायगड सेवा समिती सर्व गुरुबंधू–भगीनींनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विशेष परिश्रम घेतले.

# अनिरुद्ध खेडेकरच्या 'कवडसा'ने वेधले सर्वांचे लक्ष!

**मुरूड : प्रतिनिधी**

## सलग १७ तास मेहनत घेऊन साकारली रांगोळी





ना आसपास कोणती खिडकी ना किरणं आत यायला दरवाजा, पण तरीही जमिनीवर हा कसा काय पडलाय कवडसा ...? अंधाऱ्या जमिनीवर जिथं हलका वारा जरी आत आला तरी सगळी गडबड होईल अशा खोलीत खिडकीतून येणार्या प्रकाश किराणांना आव्हान देणारी अफलातून किमया साकारणं म्हणजे निव्वळ नवल, मात्र आपण यावर्षीदेखील काही तरी हटके करायचंच अशा हेतूनं पछाडलेल्या नांदगावच्या रांगोळीकार अनिरुद्ध खेडेकर यांने (हाइपर रियलिस्टिक पोर्ट्रेट) रांगोळी प्रकारामध्ये सलग १७ तास काम करून ही पोर्ट्रेट रांगोळी श्री कालभैरव मंदिर, रेवदंडा येथील कालभैरव जयंती निमित्त आयोजित रंगावली प्रदर्शनामध्ये साकारली आहे.

रांगोळीमध्ये डोक्यावर चाळण घेऊन उभ्या असलेल्या बालकाचे जिवंत चित्रण करण्यात आले असून, चाळणीत असलेल्या बारीक छिद्रांमधून बालकाच्या शरीरावर पडणारा पॅटर्न रुपी कवडसा छाया प्रकाशाच्या रुपात अत्यंत नाजूकपणे रेखांकित करण्यात आला आहे. ही रांगोळी बघणाऱ्यांचे एक आकर्षण ठरले आहे. रांगोळी पाहताना ती रांगोळी आहे यावर आपला विश्वासच बसत नाही हीच या अवलिया कलाकाराची पोचपावती आहे.

सर्वात कठीण अशी प्रतिकृती रांगोळीमधून साकार करणे ही खूप किचकट बाब मानली जाते, परंतु घ्यावे लागणारे परिश्रम व चिकाटी, एकाग्रत या गुणांमुळे अनिरुद्ध खेडेकर यांनी साकारलेली रांगोळी सर्वत्र प्रसिद्ध होत असून या कलाकाराचे सर्व स्तरातून कौतुक करण्यात येत आहे.

# एमसीएच्या स्पर्धेत रायगडची विजयी सलामी

## आरव बरळ, देव सिंग यांची दमदार शतके

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन (एमसीए)च्या वतीने आयोजित १४ वर्षांखालील आंतरजिल्हा दोन दिवसीय निवड चाचणी क्रिकेट स्पर्धेत रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशन (आरडीसीए)चा सलामीचा तंत्रसुद्धा फलंदाज आरव बरळ आणि मधल्या फळीतील अष्टपैलू खेळाडू देव सिंग यांनी पहिल्याच सामन्यात शतके झळकावत संघाला मोठा विजय मिळवून दिला आहे.

पुणे येथील सी.पी. मैदानावर रायगड विरुद्ध दक्षिण विभागाचा ग्रुपमधील पहिला सामना खेळण्यात आला. त्यामध्ये रायगडच्या संघाने दमदार खेळाचे प्रदर्शन करत एक डाव व १५७ धावांनी दक्षिण विभागाच्या संघावर विजय मिळवला. रायगडच्या संघाने नाणेफेकीचा कौल जिंकत प्रथम फलंदाजी करताना आठ गडी गमावत ३३० धावसंख्या उभारली होती. सलामीवीर फलंदाज आरव बरळ यांनी धुवांधार फलंदाजी करत २१ चौकार व दोन षटकार ठोकत १५५ धावा काढल्या, तर दुसऱ्या बाजूने मधल्या फळीतील अष्टपैलू खेळाडू देव सिंगने १६ चौकारांच्या साहाय्याने १०२ धावा केल्या. ३३० धावसंख्येवर रायगडच्या संघाने डाव घोषित केला.




धावांचा पाठलाग करतांना दक्षिण विभागाच्या संघांचा डाव ११३ धावसंख्येवर आटोपला. रायगडकडून अर्शद अली, विराज थोरात, प्रज्वल गोवारी यांनी प्रत्येकी दोन फलंदाज बाद केले. फॉलोऑन घेऊन पुन्हा फलंदाजीला आलेल्या दक्षिण विभागाचा संघ दुसऱ्या डावात अवघ्या ६० धावसंखेवर गारद झाला. रायगडकडून या वेळी देव सिंगने सर्वाधिक पाच विराज थोरात यांनी तीन, तर अर्शद अलीने दोन फलंदाजाना तंबूत धाडले.

रायगडच्या संघाने स्पर्धेतील पहिला सामना एक डाव व १५७ धावांनी जिंकत स्पर्धेला दमदार सुरुवात केली आहे. अष्टपैलू खेळाडू देव सिंगचे प्रशिक्षक सागर कांबळे आणि आरव बरळचे प्रशिक्षक नयन कट्टा व स्वप्नील कदम यांनी खेळाडूंच्या कामगिरीवर आनंद व्यक्त केला आहे. संघाने केलेल्या सुरेख कामगिरीबद्दल आरडीसीएच्या वतीने सर्व खेळाडूंचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.





# खारघरच्या रायन स्कूलमध्ये फुटबॉल टर्फ

## माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खारघर येथील रायन स्कूलमध्ये नव्याने फुटबॉल टर्फ विकसित करण्यात आला आहे. या टर्फचे उद्घाटन पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते गुरुवारी (दि. १३) झाले.

या वेळी परेश ठाकूर यांनी विद्यार्थ्यांसाठी आधुनिक क्रीडा सुविधा उपलब्ध करून देण्याच्या या प्रयत्नाचे कौतुक केले तसेच या नवीन टर्फमुळे युवा खेळाडूंना प्रेरणा मिळेल, त्यांचे कौशल्य वाढेल आणि अधिकाधिक विद्यार्थ्यांना फुटबॉलमध्ये सहभागी होऊन उत्कृष्ट कामगिरी करण्यास प्रोत्साहन मिळेल, असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमास माजी नगरसेवक नरेश ठाकूर, गुरूनाथ गायकर, एलिस मॅडम यांच्यासह शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.



# मुंबई विद्यापीठीय मैदानी स्पर्धेत सीकेटी कॉलेजची दमदार कामगिरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मुंबई विद्यापीठ क्रीडा संकुल येथे नुकत्याच झालेल्या विद्यापीठस्तरीय मैदानी स्पर्धेत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनी येथील स्वायत्त दर्जाप्राप्त चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली आणि एक सुवर्ण, एक रौप्य व तीन कांस्य पदके पटकविली.

श्रेयश कुंभार याने हातोडाफेकमध्ये सुवर्ण, समीक्षा बोरगेने थाळीफेकमध्ये रौप्य व हातोडाफेकमध्ये कांस्य, दर्शन सावंतनेही हातोडाफेकमध्ये कांस्य, सोनपरी गुप्ताने १० हजार मीटर धावणे शर्यतीत कांस्यपदक जिंकले.

या स्पर्धेसाठी महाविद्यालयातील जिमखाना विभागाचे चेअरमन डॉ. व्ही.बी. नाईक, सहसंचालक प्रा. अनिल नात्ती, प्रा. भरत जितेकर व प्रा. प्रतिज्ञा पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यशस्वी कामगिरीबद्दल प्राचार्य डॉ.एस.के. पाटील यांनी विद्यार्थी आणि मार्गदर्शकांचे अभिनंदन व कौतुक केले.

# रायगड विभागीय शालेय क्रीडा स्पर्धेत पनवेलच्या महात्मा फुले कॉलेजची छाप

## ३५ सुवर्ण, सहा रौप्य आणि दोन कांस्यपदकांची कमाई

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या वतीने आयोजित रायगड डीएसओ शालेय क्रीडा स्पर्धेत रयत शिक्षण संस्थेच्या पनवेल येथील महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी विविध क्रीडा प्रकारात तालुका, जिल्हा व विभागीय स्तरावर ३५ सुवर्ण, सहा रौप्य आणि दोन कांस्यपदकांची कमाई केली आहे.



यामध्ये अन्वी राठोड हिने रायफल शुटींग प्रकारात सुवर्ण, प्रथमा भगत हिने मॉडर्न पेंटॅथलॉन प्रकारात सुवर्ण, वैष्णवी घरत, सानिका म्हात्रे, सारा बैकर व तनुजा पाटील यांनी तायक्वांदामध्ये सुवर्ण, राज पाटील व अनिकेत घुगे यांनी बुद्धिबळमध्ये सुवर्ण, ओंकार पाटील व कौस्तुभ खुटले यांनी कॅरममध्ये सुवर्ण, मैदानी स्पर्धेत मुलांच्या संघाने सात सुवर्ण, मुलींच्या संघाने १० सुवर्ण, यश औटी, प्रीती मिसाळ व साक्षी एरंडे यांनी कराटेत सुवर्ण, विश्वजीत धोदे याने कुस्तीमध्ये सुवर्ण, मुलींच्या संघाने कबड्डी व खो-खो स्पर्धेत सुवर्ण, मुलांच्या संघाने खो-खोमध्ये सुवर्ण, मैदानी स्पर्धेत मुलींच्या संघाने चार रौप्य, डॉजबॉल स्पर्धेत रौप्य, रोनक जितेकर याने वेटलिफ्टिंगमध्ये रौप्य, तर मुलांच्या संघाने डॉजबॉल व क्रिकेट स्पर्धेत कांस्यपदकाची कमाई केली.

या गुणवंत खेळाडूंपैकी अन्वी राठोड हिची भोपाळ येथे होणाऱ्या ६९व्या राष्ट्रीय रायफल शुटींग स्पर्धेसाठी निवड झाली आहे तसेच प्रथमा भगतची मॉडर्न पेंटॅथलॉनसाठी, वैष्णवी घरत व सानिका म्हात्रे यांची तायक्वांदोसाठी व प्रणव कटेकरची तिहेरी उडी या स्पर्धेसाठी राज्यस्तरीय निवड झाली आहे. प्रीती मिसाळ व साक्षी एरंडे यांचीही कराटे स्पर्धेच्या विभागीय स्तरावर निवड झाली आहे.

विद्यार्थ्यांच्या या उज्ज्वल यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी, सचिव विकास देशमुख, महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन रामशेठ ठाकूर, जे.एम. म्हात्रे, महेंद्र घरत, अरुणशेठ भगत आदी मान्यवरांनी अभिनंदन केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर, उपप्राचार्य डॉ. राजाराम पाटील व डॉ. लक्ष्मण गवळी, प्राध्यापकवर्ग, जिमखाना कमिटी पदाधिकारी, सदस्यांनी कौतुक केले.



# गौरव ठाकूरचा 'सुवर्ण'वेध

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मुंबई युनिव्हर्सिटी झोन १ ही स्पर्धा प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुल शहाजीराजे रोड, विलेपार्ले येथे झाली. यातील शूटिंगच्या १० मिटर एअर पिस्टलमध्ये फुंडे येथील वीर वाजेकर एएससी कॉलेजचा विद्यार्थी गौरव ठाकूर (चिरनेर, उरण) याने सुवर्णपदक पटकावले.

सिद्धांत रायफल क्लब रायगडचा खेळाडू असलेला गौरव सध्या पनवेल येथील इंडियन मॉडेल स्कूल ॲण्ड ज्युनिअर कॉलेजच्या शूटिंग रेंजवर प्रशिक्षक राष्ट्रीय नेमबाज किशन खारके व अलंकार कोळी यांच्याकडे नेमबाजीचे प्रशिक्षण घेत आहे. त्याच्या या यशाबद्दल वीर वाजेकर एएससी कॉलेज फुंडेचे प्राचार्य व स्पोर्ट्स प्रशिक्षकांनी अभिनंदन करून पुढील राष्ट्रीय युनिव्हर्सिटी शूटिंग स्पर्धेकरिता शुभेच्छा दिल्या.

# 'सीकेटी'च्या दुर्वेश म्हात्रेचे राज्यस्तरीय तलवारबाजीत यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



राज्य क्रीडा व युवक संचालनालय अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद छत्रपती संभाजीनगर आयोजित १९ वर्षांखालील मुलांच्या राज्यस्तरीय तलवारबाजी स्पर्धेत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या (सीकेटी) नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयातील दुर्वेश बाळा म्हात्रे (बारावी सायन्स) याने तृतीय क्रमांक पटकावला.

दुर्वेशने राज्यस्तरावर मिळविलेल्या यशाबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ.एस.टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे व स्वाती पाटील, क्रीडा शिक्षक अरुण पाटील, मनोज पाटील तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्याचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# प्रिषा गोविलकरला वुशू स्पर्धेत सुवर्णपदक

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शिक्षण प्रसारक मंडळ संचालित मातोश्री गंगुबाई संभाजी शिंदे सीबीएसई इंग्रजी माध्यम शाळेतील इयत्ता चौथीतील विद्यार्थिनी प्रिषा क्षितीजा रोहित गोविलकर हिने वुशू या क्रीडा प्रकारात सुवर्णपदक पटकाविले आहे.



रोहा येथील क्रीडा संकुलात नुकत्याच झालेल्या वुशू स्पर्धेत ५६ खेळाडूंनी सहभाग घेतला होता. यामध्ये प्रिषा हिने आपले क्रीडा कौशल्य दाखवत सुवर्ण कामगिरी केली. तिला प्रशिक्षक मंदार चवरकर यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल शिपुरकर आणि वाघरे इंग्रजी माध्यम शाळेचे चेअरमन अरुण पवार यांच्या हस्ते प्रिषाचा सत्कार करण्यात आला. संस्थेच्या प्राचार्य निशिगंधा मयेकर, शिक्षकवर्ग व विद्यार्थी उपस्थित होते. संचालक, प्राचार्य, शिक्षकांनीही प्रिषाचे अभिनंदन करत शुभेच्छा दिल्या.

# 'सीकेटी'च्या अनिकेतचे किकबॉक्सिंग स्पर्धेत यश



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्य क्रीडा व युवक संचालनालय आणि मुंबई उपनगरद्वारा भारतरत्न राजीव गांधी क्रीडा संकुल धारावी येथे झालेल्या मुलांच्या विभागीय किकबॉक्सिंग स्पर्धेत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयातील अनिकेत दुशिंग (बारावी सायन्स) याने द्वितीय क्रमांक पटकावला.

अनिकेतने मिळविलेल्या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस.टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे व स्वाती पाटील, क्रीडा शिक्षक अरुण पाटील, मनोज पाटील तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी त्याचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

